POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२२३ ● मुंबई, रविवार, १६ मार्च २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## औरंगजेबच्या कबरीवरुन राज्यात वातावरण तापले

### सरकारने सुरक्षा वाढवली, एसआरपीएफची तुकडी करणार कबरीचे संरक्षण

**■मुंबई।प्रतिनिधी :**

छत्रपती संभाजीनगरमधील खुलताबाद येथे असलेल्या औरंगजेबच्या कबरीवरुन राज्यातील वातावरण तापले आहे. बजरंग दलाने ही कबर हटवण्याची मागणी केली आहे. दुसरीकडे धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठानचे मिलिंद एकबोटे यांनी ही कबर नष्ट करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर आता सरकारने औरंगजेबच्या कबरीवर सुरक्षा वाढवली आहे. त्या ठिकाणी आता एसआरपीएफची तुकडी तैनात केली आहे. त्यात 15 पोलीस कर्मचारी असणार आहे. तसेच दोन पोलीस अधिकारी कबरीचे संरक्षण करणार





आहे. मिलिंद एकबोटे यांना 5 एप्रिलपर्यंत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात येण्यास बंदी करण्यात आली आहे.

**रोहित पवार यांची वेगळी भूमिका**

औरंगजेबाच्या कबरीवरून सध्या राजकारण चांगल तापले आहे, त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी वेगळी भूमिका घेतली आहे. ते म्हणाले, 27 वर्ष औरंगजेबाला येथे राहून राज्य करता आले नाही. त्याच प्रतीक म्हणून औरंगजेबाची कबर आहे. ही कबर आज काढून टाकली तर भविष्यात लोक गडबड करतील. त्यामुळे एक प्रतीक म्हणून त्या कबरीला हात न लावणे योग्य ठरेल, असे मत रोहित पवार यांनी व्यक्त केले आहे.

**काँग्रेसचा कबर हटवण्यास विरोध**

काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी करणे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास पुसण्याचा प्रकार आहे. विश्व हिंदू परीषद आणि बजरंग दल यांनी स्टंटबाजी करू नये. औरंगजेब जेवढा क्रूर होता तेवढ्याच क्रूरपणे महाराष्ट्रातल फडणवीस सरकार वागत आहे. घाशीराम कोतवाल प्रमाणे गृहविभाग चालवले जात आहे. औरंगजेबाची कबर म्हणजे विरत्वाची कबर नाही तर ती कबर क्रूर पणाची आहे. त्यामुळे ती कबर शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देखील आहे.

भाजप नेते अतुल भातखलकर म्हणाले, औरंगजेबाची कबर सजवण्याची आवश्यकता काय आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, औरंगजेबाच्या थडग्यावर जाऊन विरोधकांकडून फुल उधळली जातात. औरंगजेबाचा थडगे सजवून मुस्लिम तुष्टीकरण केले जात आहे. त्यामुळे मी विरोधकांना एवढाच इशारा देईन छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास लपवण्याचे पाप तुम्ही इतकी वर्ष केले. आता हिंदू समाज जागृत झालेला आहे. यापुढे औरंगजेबाचे थडगे वाचवण्याचा प्रयत्न केला तर हिंदू समाज त्या औरंगजेबाच्या थडग्यात तुम्हाला पुरल्याशिवाय राहणार नाही.

**बजरंग दलाचे औरंगजेबाच्या कबरीविरोधात आंदोलन**

औरंगजेबाची कबर आमच्या गुलामगिरीची, लाचारीची आणि अत्याचारांची आठवण करून देते. महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर ही कबर काढावी. अन्यथा, बजरंग दल स्वभिमानी हिंदू समाजाला घेऊन रस्त्यावर उतरेल, असा इशारा बजरंग दलाने दिला आहे. औरंगजेब याची कबर हटवली नाही तर पूर्ण महाराष्ट्रात एकाच दिवशी सर्व तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन करणार असल्याचे बजरंग दलाने म्हटले आहे.

## पुण्यात आहे आशिया खंडातील सर्वात मोठ मनोरुग्णालय इथं झालाय मोठा भ्रष्टाचार

**■पुणे।प्रतिनिधी :**

आशिया खंडातील सर्वात मोठ मनोरुग्णालय असलेल्या येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात कोट्यवधींचा गैरव्यवहार झाला आहे. याप्रकरणी चौकशी समितीने दिलेल्या अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. येरवडा मनोरुग्णालयात अनागोंदी कारभार सुरू असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते शरत शेट्टी यांनी केली होती. त्या तक्रारीवरून गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल आरोग्य विभागात सादर करण्यात आला. अहवालातून स्वच्छता कंत्राट, साहित्य खरेदी इतकचं नाही तर मनोरुग्णांच्या अंतर्वस्त्र खरेदीतही पैसे खाल्याचं समोर आल आहे.

अनेक तक्रारी असताना स्वच्छता कंत्राटदारावर महिन्याला १४ लाखांचा खर्च होतो. सोलर वॉटर हिटर खरेदीवर ७३ लाखांचा खर्च, प्रत्यक्षात सोलर वॉटर हिटर ऐवजी इलेक्ट्रिक हिटरचा कंत्राटदाराकडून पुरवठा केला जातो. २०२४ मध्ये ३६१ मनोरुग्णांची गरज नसताना खाजगी मनोरुग्णांमध्ये रवानगी करण्यात आली.



पुनर्वसन केंद्रासाठी आलेला अकरा लाखांचा निधी हडप करण्यात आला. रुग्णांना निकृष्ट दर्जाच्या दुधाचं वाटप करण्यात आलं. अंतर्वस्त्र तसेच दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या खरेदीमध्ये लाखोंचा अपहार झाला आहे. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर सुनील पाटील यांच्या कार्यकाळात हा भ्रष्टाचार झाल्याचा ठपका अहवालात ठेवण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून अपहाराची रक्कम वसूल करण्याबरोबर योग्य ती कारवाई करण्याची शिफारस समितीने केली आहे.

भ्रष्टाचाराचा ठपका ठेवण्यात आलेले तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ सुनील पाटील सध्या रजेवर आहेत. त्यांनी शासनाला कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा ठपका अहवालात ठेवण्यात आलाय..आता लवकरात लवकर आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीची मागणी होत आहे.

## मार्च पहिल्या आठवड्यातच उन्हाचा पारा ४१.२ अंशावर



**■मुंबई।प्रतिनिधी :**

राज्यातील बहुतांश भागात तापमानाचा भडका उडाला असल्याचे चित्र बघायला मिळात आहे. परिणामी नागरिकांना होळीपूर्वीच प्रचंड उष्ण व दमट हवामानाला समोर जावं लागत आहे. तर दुसरीकडे राज्यातील काही भागात उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत असल्याचे चित्र आहे. अशातच विदर्भातील अनेक जिल्ह्यात उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच सूर्य आग ओकत असल्याचे चित्र आहे. तर उष्णतेनं अंगाची लाहीलाही होत असताना मार्चच्या पहिल्या आठवड्यातच यवतमाळचा उन्हाचा पारा ४१.२ अंशावर गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे मार्च ते मे हे महिना अधिक अवघड जाणार असल्याचे सांगितलं जातंय. मार्च महिन्यातच यवतमाळकरांना उन्हाच्या झळा सोसाव्या लागत आहे. सध्या सूर्य आग ओकू लागला असून शहराचा पारा ४१.२ सेल्सिअस अंशावर पोहोचला असल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. ४१ अंशावर पारा हा एप्रिलच्या शेवटी आणि मे महिन्यात जात असतो. मात्र, तपमान ४१ अंशावर मार्च महिन्यातच गेल्याने यावर्षी मार्च ते मे महिन्यात तापमान चांगलीच वाढ होण्याचे संकेत आहे.

## व्हॉट्सअपवरील ‘तो’ अश्लील व्हिडिओ ५० लाख रुपयांना पडला असता पण...

**■मुंबई।प्रतिनिधी :**

अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देत ५० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार बदलापुरमध्ये समोर आला आहे. याप्रकरणी बदलापूर पूर्व पोलिसांनी गुन्हा दाखल करत चार आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. व्हॉट्सअपवरील एका व्हिडीओमधून खंडणीचा प्रकार सुरु झाला. पोलिसांनी माजी नगरसेवकालाच धमकावलं जात असल्याने तातडीने तपास सुरु केला.

**व्हॉट्सअपवर व्हिडिओ आला अन्...**

मिळालेल्या माहितीनुसार, बदलापूरमधील माजी नगरसेवक शैलेश वडनेरे यांना महिन्याभरापूर्वी एका अज्ञात नंबरवरून व्हॉट्सअपवर एक व्हिडिओ आला, या व्हिडिओमध्ये त्यांचे अश्लील फोटो होते. हा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत समोरच्या व्यक्तीने त्यांच्याकडे ५० लाख रुपयांची खंडणी मागितली. सुरुवातीला हा खोडसाळपणा वाटल्याने वडनेरे यांनी त्याकडे लक्ष दिलं नाही, मात्र खंडणीखोरांचा तगादा वाढल्यानंतर वडनेरे यांनी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार केली. या तक्रारीची गंभीर दखल घेत बदलापूर पूर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर आणि राजेश गज्जल यांनी तांत्रिक तपास सुरु केला.

**पूर्वी डॉकटरच्या घरावर टाकलेला कोट्यवधींचा दरोडा**

तपासाअंती बदलापूरमधूनच चार जणांना बेड्या ठोकल्या. अक्षय उर्फ बकरी गोविंद जाधव, रोनित दयानंद आडारकर, दीपक मधुकर वाघमारे आणि पुष्कर हरिदास कदम अशी अटक करण्यात आलेल्या चौघांची नावं आहेत. या सर्वांना १२ मार्च रोजी न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्यांना १५ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या चौघांपैकी अक्षय उर्फ बकरी जाधव आणि दीपक वाघमारे या दोघांवर यापूर्वी अंबरनाथमध्ये एका नामांकित डॉक्टरच्या घरावर कोट्यवधी रुपयांचा दरोडा टाकल्याचा गुन्हा दाखल आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर यांनी दिली.

**जामीनावर बाहेर असताना गेला गुन्हा**

आधीच्या गुन्ह्यातून जामीनावर सुटल्यानंतर झटपट पैसे कमावण्याच्या उद्देशाने आरोपींनी माजी नगरसेवक शैलेश वडनेरे यांना खंडणीसाठी धमकी दिली. मात्र बदलापूर पूर्व पोलिसांनी त्यांचा हा डाव हाणून पाडत त्यांना पुन्हा एकदा बेड्या ठोकल्या आहेत. हा व्हिडीओ कसा तयार केला? अशाप्रकारे यापूर्वी कोणाकडून खंडणी मागितली आहे का? या सारख्या गोष्टींचा तपास पोलीस करत आहेत.



## स्वारगेटनंतर भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतच तरुणीवर बलात्कार

**■पुणे।प्रतिनिधी :**

पुण्याच्या स्वारगेट स्थानकात शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार झाल्याच्या घटनेनंतर महाराष्ट्रात खळबळ उडाली. यानंतर पुण्यात पुन्हा एकदा बलात्काराची घटना घडली आहे. भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतच तरुणीवर बलात्कार झाला आहे. परिचयाच्या व्यक्तीनेच बलात्कार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पुण्यात स्वारगेट चे घटना ताजी असतानाच भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका तरुणीवर बलात्काराची घटना घडली. ओळखीचा गैरफायदा घेत तरुणीवर बलात्कार केला. इतकच नव्हे तर तिला सोशल मीडियातून वारंवार धमकी दिली जात आहे. असा आरोप पीडित तरुणीने केला आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन मध्ये आरोपी सिद्धांत रणधीर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरुणीने तक्रार करुन वीस दिवस झाले आहेत. मात्र, अद्याप आरोपीला अटक करण्यात आली नाही. पीडित तरुणीला आरोपी सोशल मीडियाच्या माध्यमातून वारंवार धमकी देत आहे. तसेच तिच्या मोबाईल क्रमांकावर अश्लील फोटो सुद्धा आरोपीकडून पाठवण्यात आले. यावर पोलिसांनी लवकरात लवकर आरोपीला अटक केली जाईल आणि कठोर कारवाई केली जाईल असे म्हटले आहे.

**१४ वर्षीय विद्यार्थीनींवर रिक्षा चालकाने अत्याचार**

यवतमाळच्या आर्णीमध्ये एका १४ वर्षीय विद्यार्थीनींवर रिक्षा चालकाने अत्याचाराचा प्रयत्न केला. यावेळी विद्यार्थीनींने आरडाओरड केल्याने एका व्यक्तीने तिला शाळेबाहेर सोडलं. त्यानंतर विद्यार्थीनीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बदलापूरमध्ये दोन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप असलेला आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीचा अपघाती मृत्यू म्हणूनच तपास करणार का? अशी विचारणा उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली. या प्रकरणाची अपघाती मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून गुन्हे अन्वेषण विभागातर्फे स्वतंत्र चौकशी सुरू आहे. या चौकशीअंती याप्रकरणी गुन्हा दाखल करायचा की नाही याचा निर्णय घेतला जाईल, या आपल्या भूमिकेचा राज्य सरकारच्या वतीने वरिष्ठ वकील अमित देसाई यांनी बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी पुनरुच्चार केला.

## अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून २४ तासाच्या आत पोलिसांनी गुन्हेगारांच्या आवळल्या मुसक्या

**■विरार।प्रतिनिधी :**

अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून खुनाचा गुन्हा २४ तासाच्या आत उघड करुन आरोपीला जेरबंद करण्यात गुन्हे शाखा कक्ष- ३ विरार यांना यश.अधिक माहितीनुसार मांडवी पोलीस ठाणे हद्दिमध्ये दि. १३.०३.२०२५ रोजी कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरून कोणत्यातरी अज्ञात हत्याराने अनोळखी महिलेचा धडापासून गळा कापून तीचे मुंडके धडापासुन वेगळे करुन खुन केला आहे. व तीचे धड पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने इतरत्र कोठेतरी टाकून मुंडके गोण्यांमध्ये व जांभळया रंगाच्या ट्रॅव्हलींग बॅगेत भरून मांडवी पोलीस ठाण्याचे हद्दीत पिरकुंडा दगार्पासून १०० मिटर अंतरावर रोडचे कडेपासून ३० फुट अंतरावर खोलगट व झाडेझुडपे असलेल्या जागेत टाकून पुरावा नष्ट केला म्हणून त्याबाबत दि.१४/०३/२०२५ रोजी मांडवी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गंभीर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवुन लवकरात लवकर गुन्हा उघडकीस आणणे बाबत मा. वरिष्ठांनी पोलिसांना आदेशीत केले होते. तसेच मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये नमुद गुन्हयाच्या घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देवुन त्या ठिकाणी एका ज्वेलरी शॉपचे पाकीट प्राप्त झाले होते. सदर पाकिटावरील ज्वेलरी शॉपचे मालकाला संपर्क करुन त्यांचेकडील गिऱ्हाईकांबाबत माहिती घेतली असता महिला ही तिचे परिवारासह मुंबई परिसरात राहत असल्याचे समजले. त्याआधारे सदर महिलेची व तिचे परिवाराची माहिती काढली असता सदरचा परिवार हा मागील काही दिवसांपासुन त्यांचे पत्यावरुन इतर ठिकाणी राहवयास गेल्याने कोणतीही ठोस माहिती उपलब्ध होत नव्हती. सदर कुटूंबाची त्यांचे पुर्वी राहत असलेल्या पत्यावरुन पश्चिम बंगाल येथील नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला असता त्यांनी महिला नामे सौ. उत्पला हरिश हिप्परगी, वय ५१ वर्षे, मुळ रा. नैहाटी, जिल्हा उत्तर २४ परगणा, राज्य पश्चिम बंगाल ही तिचे पती हरिश बरवराज हिप्परगी यांचे सोबत राहत असुन तिच्याशी दोन महिन्यापासुन संपर्क होत नसल्याचे सांगीतले. त्याअनुषंगाने मिळालेल्या गोपणीय माहितीवरुन इसम हरिश बरवराज हिप्परगी, वय ४९ वर्षे, धंदा- इमीटेशन ज्वेलरी, रा. रोनक अपार्टमेंट, रुम नं. बी / १०१, रेहमत नगर, नालासोपारा पूर्व मुळ रा. कर्नाटक याला नालासोपारा पूर्व परिसरातुन ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने चौकशी केल्यानंतर समजले की, मयत महिला ही त्याची पत्नी असुन गेल्या काही महिन्यांपासुन त्यांचेत कौटुंबीक वाद होते. दि.०८/०१/२०२५ रोजी रात्री देखील त्यांच्या मध्ये घरगुती कारणावरुन भांडण झाले त्यामुळे नेहमीच्या भांडणाला कंटाळुन आरोपी याने रागाच्या भरात रात्री ०३:०० वाजेच्या सुमारास त्याचे पत्नीचा गळा दाबुन तिला जिवे ठार मारुन तिचे मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे हेतुने मुंडके शरिरापासुन वेगळे करुन ते एका ट्रॅव्हल बॅग मध्ये टाकुन झाडाझुडपात फेकुन दिले व बाकी शरीर हे देखील एका गोणीत भरुन दुसरीकडे फेकले असल्याचे आरोपी कडुन समजले आहे. आरोपी हरिश बरवराज हिप्परगी, वय ४९ वर्षे याला पुढील कारवाई करीता मांडवी पोलीस ठाणे येथे हजर करण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास श्री संजय हजारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मांडवी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो., मा. श्री दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो., मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि. भा. वि. व पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / शाहुराज रणवरे, सहा.पो. निरी. / सुहास कांबळे, पो.हवा./ मुकेश तटकरे, रमेश आलदर, सागर बारवकर, प्रशांत पाटील, अमोल कोरे, पो. अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, आतिश पवार, तुषार दळवी, मनोहर तारडे, म. सु. ब. / सागर सोनवणे, प्रविण वानखेडे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३ तसेच स.फौ. / संतोष चव्हाण नेमणुक सायबर पोलीस ठाणे यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

## कोलकत्ता येथील आंगडीया व्यापाऱ्याची सुमारे ५० लाखाची फसवणूक करणाऱ्या गुन्हेगारास पोलिसांनी केले जेरबंद

**■नालासोपारा।प्रतिनिधी :**

कोलकत्ता येथील एका आंगडीया व्यापाऱ्यास ‘‘सेंच्युरी प्लाय’’ कंपनीचे मालक असल्याचे भासवून ५०,००,०००/- रुपयांची फसवणुक करणाऱ्या टोळीस जेरबंद करण्यास गुन्हे शाखा कक्ष ३ यांना यश. मिलेल्या माहितीनुसार दिनांक ०१/०३/२०२५ रोजी अज्ञात आरोपींनी सिलीगुडी, कोलकत्ता येथील डॉ. अग्रवाल यांना व्हॉट्सअप कॉल करुन त्यांच्या परिचयातील ‘‘सेंच्युरी प्लाय’’ कंपनीचे मालक श्री भजनका बोलत असल्याचे भासवून त्यांचेकडुन गुन्ह्यातील फियार्दी यांच्या वडीलांचे मार्फतीने ५०,००,०००/- रुपये घेवुन फसवणुक केली म्हणुन सदर बाबत दि. ०४/०३/२०२५ रोजी कोलकत्ता १६, पार्क स्ट्रिट पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता

सदर गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याचे अनुषंगाने कलकत्ता, राज्य पश्चिम बंगाल येथील पोलीस पथक हे दिनांक १२/०३/२०२५ रोजी मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त गुन्हे यांना भेटले असता मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी सदर प्रकरणाची गांभिर्याने दखल घेवुन गुन्ह्यातील आरोपी यांचा शोध घेण्या बाबत पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा कक्ष- ३ यांना आदेशीत केले होते.




सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान कौशल्यपुर्ण व मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे १) सैयद रियाज काझी, वय ३६ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. ग्लोरियस लाईफस्टाईल, रुम न.सी./१०५, स्कायहाईट बिल्डींगच्या पाठिमागे, नालासोपारा पश्चिम, २) वकप मोहम्मद जावेद चांदीवाला वय २८ वर्षे, धंदा रिक्षा चालक, रा. ग्रिन एव्हन्यु बिल्डींग, रुम नं. ए / २०७, करारीबाग, टाकीपाडा, नालासोपारा पश्चिम ३) सचिन मनोहर प्रसाद आर्यभट, वय ३२ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. मौर्या कंपाऊड चाळ, वाकनपाडा, नालासोपारा पूर्व यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे गुन्ह्याचे अनषंगाने चौकशी करता त्यांचा सदर गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सदर आरोपींना पुढील कारवाई करीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक / संदिप दत्त अँन्टी रावडी सेक्शन डिटेक्टीव डिपार्टमेंट, लालबजार, कोलकत्ता पोलीस यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो., मा. श्री दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो., मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि. भा. वि. व पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / शाहुराज रणवरे, सहा.पो.निरी./ सुहास कांबळे, पो. हवा. / मुकेश तटकरे, रमेश आलदर, सागरबारवकर, प्रशांत पाटील, अमोल कोरे, पो.अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, आतिश पवार, तुषार दळवी, मनोहर तारडे, म. सु. ब. / सागर सोनवणे, प्रविण वानखेडे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष- ३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# गिरणी कामगारांचे स्वप्न अपूर्णच

संपकाळापासून सुरू असलेला गिरणी कामगारांचा संघर्ष आजही संपलेला नाही. आज गिरणी कामगार आणि त्यांचे वारस हक्काच्या घरासाठी रस्त्यावर उतरून लढत आहेत. सरकार कोणतेही येवो, युती असो की आघाडी असो, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न अद्यापि सुटलेला नाही. उलट दूरवरची, इतरांना नको असलेली घरे गिरणी कामगारांना देऊन हात झटकण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. मुंबईच्या जडणघडणीत गिरणी कामगारांचे मोठे योगदान आहे. यामुळे मुंबईतील बंद कापड गिरण्यांतील गिरणी कामगार व त्यांच्या वारसदारांना गिरण्यांच्या जमिनीवर घरे देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे धोरण सरकारने २००१ मध्ये जाहीर केले. त्यानुसार बंद गिरण्यांच्या जमिनीपैकी एक तृतीयांश जमिनीवर घरे उभारून त्यांचे वाटप करण्याची जबाबदारी सरकारने म्हाडावर सोपविली आहे. म्हाडाकडे १ लाख ७४ हजार १७२ गिरणी कामगार आणि वारसांनी घरासाठी अर्ज केले होते. त्याप्रमाणे म्हाडाने गेल्या २४ वर्षांत १५ हजार ८७० गिरणी कामगारांना घरांचे वाटप केले आहे. उर्वरित कामगारांना घरे कधी मिळणार? याची डेडलाइन अद्याप सरकारने जाहीर केलेली नाही. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ५८ कापड गिरण्या होत्या. मुंबईतील जागांचे भाव वाढू लागल्याने मालकांनी त्या विक्रीस काढल्या. गिरण्यांच्या जागेवर टोलेजंग टॉवर उभे राहिले आहेत. ३० बंद कापड गिरण्यांच्या मालकांनी महानगरपालिकेच्या ताब्यात जागा दिली. यातील काही गिरण्यांची जागा अद्याप म्हाडाला उपलब्ध झालेली नाही, तर २८ गिरण्या बंद झाल्यानंतरही या गिरण्यांची जागा महापालिका आणि म्हाडाला मिळालेली नाही. त्यामुळे गिरणी कामगारांना मुंबईत घरे उपलब्ध करून देण्यात अडथळा आला आहे. या गिरणी मालकांकडून गिरणी कामगारांच्या घरांसाठी जमीन मिळविण्यासाठी सरकारकडून पुरेसे प्रयत्न होत नसल्याने कामगार आणि त्यांच्या वारसांचे मुंबईत घर मिळण्याचे स्वप्न अधुरे राहिले आहे. गिरणी कामगारांच्या घरांसाठी मुंबईत जमीन उपलब्ध होत नसल्याचे कारण सरकारने पुढे केले आहे. त्यानुसार कामगारांना मुंबई महानगर क्षेत्रात घर देण्याचा शासननिर्णय सरकारने घेतला आहे. या निर्णयाला गिरणी कामगार संघटनांकडून तीव्र विरोध होत आहे. मुंबईत घरे उपलब्ध होत नसल्याने एमएमआरडीएने पनवेल कोन येथे उभारलेली भाडेतत्त्वावरील २ हजार ४१७ घरे गिरणी कमगारांना दिली. ही घरे गिरणी कामगारांनी ताब्यात घेतली आहेत. यानंतर खासगी विकासकांची वांगणी आणि शेलू येथील घरे गिरणी कामगारांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाला गिरणी कामगार संघटनांकडून तीव्र विरोध होऊ लागला आहे. गिरण्यांचा संपकाळ ते आता हक्काच्या घराची मागणी यासाठी कामगार रस्त्यावरील लढाई लढत आहे. संप करूनही गिरणी कामगारांच्या हाती काही पडले नाही. कामगार आणि वारसांना घर देण्याची घोषणा झाल्यापासून विविध मागण्यांसाठी गिरणी कामगार आणि संघटना आंदोलने करत आहेत. या आंदोलनानंतरही सुमारे एक लाख गिरणी कामगार आणि वारस त्यांच्या हक्काच्या घराच्या प्रतीक्षेत आहेत. गिरणी कामगारांचे नेतृत्व करणारे नेते वृद्धापकाळाकडे झुकले आहेत, तर काहींचे निधन झाले. यामुळे गिरणी कामगारांच्या आंदोलनाची धार कमी झाली आहे. यातच कामगारांच्या संघटनांमध्ये एकवाक्यता नसल्याने संघटनांचा आवाज क्षीण झाला आहे. युती, आघाडी कोणाचेही सरकार राज्यात आले तरी त्यांनी गिरणी कामगारांच्या घराच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिलेले नाही. त्यामुळेच तब्बल २४ वर्षांत केवळ १५ हजार ८७० गिरणी कामगारांना घरे मिळाली. महायुतीचे शिंदे सरकार सत्तेत येताच सरकारने गिरणी कामगार आणि वारसांची पात्रता निश्चित करण्याची घाई केली. मात्र या कामगारांना घरे कुठे आणि कधी देणार याविषयीचे ठोस धोरण गृहनिर्माण विभागाने तयार केले नाही. त्यामुळे कामगार आणि वारसांना घरासाठी आणखी काही वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे. यापूर्वी म्हाडाकडे १ लाख ७४ हजार १७२ गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांनी घरासाठी अर्ज केले होते. यामध्ये गिरणी कामगारांच्या एकाहून अधिक वारसांनी अर्ज केल्याने २०२३ मध्ये सरकारने गिरणी कामगार व त्यांच्या वारसांच्या पात्रता निश्चितीकरिता 'म्हाडा'तर्फे ऑफलाइन व ऑनलाइन पद्धतीने कागदपत्रे स्वीकारण्यासाठी अभियान सुरू केले. यामध्ये आजवर एक लाख कामगार पात्र ठरले आहेत, तर काही हजार कामगारांच्या पात्रतेचे काम सुरू आहे. त्यामुळे सरकारला गिरणी कामगारांसाठी एक लाखाहून अधिक घरे उपलब्ध करून द्यावी लागणार आहेत. मुंबईत केंद्र सरकारच्या मालकीच्या १० ते १२ गिरण्यांतील १०० ते १२० एकर जमीन शिल्लक आहे. त्याचप्रमाणे खटावसहीत काही खासगी गिरण्यांच्या मालकांची घराकरिता जमीन शिल्लक आहे. तसेच काही गिरणी कामगारांच्या चाळीतही घरांची तरतूद होऊ शकते, असा दावा कामगार संघटना करत आहेत. पण त्यांचा आवाज सरकारच्या कानी जात नसल्याने गिरणी कामगार वृद्धापकाळात रस्त्यावरील लढाई लढत आहेत. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या काही प्रकल्पांकडे सर्वसामान्य नागरिकांनी पाठ फिरवली आहे. रेल्वे, रस्ते मागार्पासून दूर ठिकाणी घर खरेदी करण्यास सर्वसामान्य नागरिक तयार नाही. या योजनेत घरांची नोंदणी केलेल्या नागरिकांनी पुन्हा घरे रद्द केली आहेत. मात्र हीच घरे गिरणी कामगारांच्या माथी मारून आपल्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा प्रयत्न सरकार करत असल्याचे दिसते. या प्रयत्नांनंतरही अनेक गिरणी कामगारांचे हक्काच्या घरांचे स्वप्न स्वप्नच राहणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

# हे म्हणजे महापालिका संपवण्याचा 'कट'!

**राज्य सरकारने नाशिक सिंहस्थ कुंभमेळयासाठी महापालिकेला बगल देऊन स्वतंत्र प्राधिकरण स्थापण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो केवळ हुकूमशाही वृत्तीचा नमुनाच नाही, तर सरळसरळ लुटमारीचा कट आहे. हा धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा असूनही त्याकडे सत्ताधाऱ्यांच्या तुंबड्या भरण्याच्या साधनासारखे पाहिले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नाशिकच्या सिंहस्थाची खरोखर काळजी असेल, तर त्यांनी केंद्र सरकारकडून भरघोस निधी आणून दाखवावा.**



नाशिक महापालिका आणि त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेने यापूर्वी अनेक कुंभमेळे यशस्वीरित्या पार पाडले आहेत. त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचा संपूर्ण देशाला अभिमान वाटतो, पण अचानकच सरकारला त्यांच्यावर अविश्वास वाटू लागला आहे. सिंहस्थासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची निर्मिती हा काही साधा प्रशासकीय निर्णय नाही तर हा संगनमताने आखलेला डाव आहे. नाशिककरांच्या तोंडाला पाने पुसून ठराविक ठेकेदार आणि बाहेरून आणलेल्या अधिकार्यांना सत्ताधार्यांनी कुरण खुलं करून देण्याचा हा गलिच्छ प्रकार आहे.

हा निर्णय म्हणजे स्थानिक प्रशासनावर सरळसरळ चपराक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी लाखो भाविक येतात, प्रचंड प्रमाणात निधी येतो आणि हाच पैसा खिशात टाकण्यासाठी सत्ताधारी आणि त्यांच्या मर्जीतील अधिकाऱ्यांनी हा 'प्राधिकरणाचा खेळ' सुरू केला आहे. ज्यांनी या शहराचे बारकावे समजून घेतले आहेत, त्या महापालिकेतील अधिकाऱ्यांना धुडकावून बाहेरून आणलेल्या अधिकार्यांना सिंहस्थाच्या सगळ्या निर्णय प्रक्रियेवर बसवले जात आहे.

या सगळ्या प्रकाराला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची आडकाठी होईल, म्हणून त्यांना थेट बायपास करण्यात आले आहे. त्यांच्या नगर विकास मंत्रालयाच्या अखत्यारित असलेली महापालिका बाहेरच्या विभागांच्या जाळ्यात अडकवली जात आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंता महुआ बॅनर्जी यांना महापालिकेचा अतिरिक्त कार्यभार दिल्याचा प्रकार हेच दर्शवितो. महापालिकेतील अधिकारी निर्णय घेण्यास आणि काम करण्यास अकार्यक्षम आहेत, हे बॅनर्जी यांच्या नियुक्तीवरून स्पष्ट होते.

म्हणूनच बॅनर्जी यांची नियुक्ती महापालिकेला संपवण्याच्या कटाचाच एक भाग आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. बॅनर्जींसारख्या बाहेरच्या अधिकाऱ्यांना ना नाशिकची माहिती आहे, ना येथे येणाऱ्या लाखो भाविकांच्या अडचणींबद्दल त्यांना काहीही देणेघेणे आहे. त्यांना फक्त सरकारी आदेशाचे पालन करायचे आहे आणि कोट्यवधींच्या निविदा मोजायच्या आहेत. वास्तविक, स्थानिक प्रशासनाने याआधी कुंभमेळे यशस्वीरित्या पार पाडले आहेत.

मग आता अचानक त्यांच्यावर अविश्वास दाखवण्याचे कारण काय? स्थानिक अधिकारी हे नाशिकचे मूळ रहिवासी असल्याने त्यांना शहराची खरी गरज माहीत आहे. पाणीपुरवठा वाहिन्या, मलवाहिन्या, मुख्य रस्ते, पादचारी मार्ग, घाटांची देखभाल, विजेचे नियोजन, गर्दी नियमन, अन्न व औषध प्रशासन आदी महत्त्वाच्या बाबतीत त्यांना सखोल माहिती आहे. मात्र, बाहेरून आलेल्या अधिकार्यांना शहरातील समस्यांची तितकीशी जाणीव नसते. त्यामुळे नाशिक कुंभमेळ्याच्या कामांची सूत्रे स्थानिक अधिकार्यांच्या हाती असणे, हे नाशिककरांच्या हिताचे आहे.

सिंहस्थासाठी दिला जाणारा निधी हा साधुसंतांच्या, भाविकांच्या आणि स्थानिक जनतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आहे. तो काही सत्तेच्या दलालांसाठी नाही, हे राज्य सरकारने लक्षात घ्यावे. मुख्यमंत्र्यांनी घेतलेला प्राधिकरणाचा निर्णय म्हणजे स्थानिक प्रशासनाची सरळसरळ अवहेलना करून त्यांच्या हातून सिंहस्थ हिसकावण्याचा खटाटोप आहे. दुर्दैवाने या विरोधात आवाज उठवायला महापालिकेत नगरसेवकच नाहीत. त्यामुळे सरकारचे फावत आहे.

किंबहुना याचसाठी 'प्रशासनराज'ची व्यवस्था केली का, असाही संशय व्यक्त होतो. सरकारच्या या कटकारस्थानाविरोधात आवाज उठवायला विरोधी पक्षात स्थानिक आमदारही शिल्लक ठेवलेले नाहीत. दुसरीकडे सत्ताधारी आमदार केवळ आपल्या 'आका'ला खूश ठेवण्यात धन्यता मानत आहेत. किंबहुना या 'आका'ची खुशी द्विगुणीत करण्यासाठी ते जाणीवपूर्वक प्रयत्नदेखील करत आहेत. त्यातून नाशिकचे नुकसान होत आहे, याची तमा कुणालाही नाही.

महापालिकेला सगळ्या निर्णयांमधून बाहेर काढण्याचे एकमेव कारण म्हणजे सिंहस्थाच्या नावाने येणाऱ्या 'गंगाजळी'ची उघड लूट अधिक सहज व्हावी! सत्ताधाऱ्यांच्या नातेवाईकांना, मित्रांना आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या ठेकेदारांना मोठमोठे प्रकल्प देण्याचा हा डाव आहे. सरकारी अधिकारी आणि दलालांच्या या साटेलोट्यामुळे सिंहस्थ हा केवळ पैशांचा बाजार बनणार आहे. त्यामुळे हे सरकार कोणासाठी काम करतंय? जनतेसाठी की ठराविक ठेकेदारांसाठी? असा प्रश्न पडतो.

या प्राधिकरणाचा एकच उद्देश आहे- महापालिकेच्या हद्दीत राज्य सरकारने जबरदस्तीने प्रवेश करायचा आणि महापालिकेचा संपूर्ण कारभार हायजॅक करायचा! इतकेच नव्हे, तर महापालिकेच्या अधिकाऱ्यांना इथल्या समस्यांची खरी माहिती असली, तरी त्यांना दुय्यम दर्जाची कामे देऊन त्यांच्या अंगावर जबाबदारीच येऊ नये, याची काळजी घ्यायची. सिंहस्थ नाशिककरांचा आहे, साधुसंतांचा आहे, लाखो भाविकांचा आहे.

हा सत्ताधाऱ्यांचा, ठेकेदारांचा किंवा भ्रष्ट अधिकाऱ्यांचा खेळ नाही. त्यामुळे सरकारने हा अन्यायकारक निर्णय तातडीने मागे घ्यावा. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सिंहस्थाच्या आयोजनाची जबाबदारी द्यावी. नाशिकच्या नागरिकांनीही आता गप्प बसून चालणार नाही. हे शहर 'आपलं आहे' या भावनेने प्राधिकरणाविरुद्ध जोरदार आवाज उठवला पाहिजे. सिंहस्थ लुटण्याचा हा सरकारचा कट नाशिककरांनी मोडून काढला पाहिजे, अन्यथा भाविकांची आस्था आणि श्रद्धा दोन्ही सत्ताधाऱ्यांच्या पायाखाली तुडवली जाईल!

राज्य शासनाला प्राधिकरणाला गोंजारायचं असेल, तर सिंहस्थाची पूर्णतः जबाबदारी स्थानिकांच्या खांद्यावरून काढून घ्यावी. एकदा 'दूध का दूध, पानी का पानी' होऊनच द्यावे. परसेवेतील अधिकाऱ्यांमध्ये सिंहस्थ पेलवण्याची क्षमता किती आहे, हे सरकारने आजमावूनच बघावे. असेही महापालिकेच्या कायद्यात सिंहस्थ नियोजनाची कोठेही तरतूद नाही. त्यामुळे महापालिकेवर सिंहस्थासाठी कुठलाही आर्थिक बोजा टाकू नये.

हा सोहळा केवळ नाशिकपुरताच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचा लौकिक वाढवणारा आहे. त्यामुळे आता राज्य सरकारनेच पुढाकार घेऊन सोहळ्याला देदीप्यमान करावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी सांगितलेच आहे की, हा कुंभमेळा डिजिटल टेक्नॉलॉजीचा असेल. त्यामुळे त्यांनी यापुढे नाशिकमध्ये येऊन कामे करण्यापेक्षा वेगवेगळे ॲप्स तयार करून त्यावर नाशिकची माहिती द्यावी, गोदावरीचे दर्शन द्यावे... किंबहुना शक्य असल्यास असे ॲप तयार करावे, ज्याला क्लिक केल्यावर भाविकांना स्नान केल्याचा परमानंद मिळेल.

त्यासाठी नाशिकमध्ये येण्याची गरज ती काय? असेही कामांच्या बाबतीत गेल्या कुंभमेळ्याच्या तुलनेत यंदा वर्षभराचा उशीर झालेलाच आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कामांपेक्षा डिजिटल कुंभमेळ्यातच डुबकी मारायला काय हरकत? डिजिटल कुंभमेळ्यासाठीही कोट्यवधींच्या निविदा काढताच येतील की! मुळात कुंभमेळ्याच्या कामांना जाणीवपूर्वक दिरंगाई करणे ही बाब कुंभमेळा महापालिकेच्या हातून हिरावून घेण्याचाच भाग आहे.

अशा दिरंगाईकडे अंगुलीनिर्देश करीतच प्राधिकरणाचा झेंडा नाशकात फडकवला जाणार आहे. मुख्यमंत्र्यांना खरोखर नाशिकच्या कुंभमेळ्याची काळजी असेल, तर त्यांनी यासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळवून द्यावा. फडणवीस यांचे केंद्रातील वजन बघता, ते ही बाब सहजपणे साध्य करू शकतात.

प्रयागराजला नुकत्याच झालेल्या कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकारने तब्बल २१०० कोटींचा निधी दिला. त्यापूर्वी, म्हणजे २०१३ च्या कुंभमेळ्यासाठी ११५२ कोटींचा निधी दिला होता. उत्तराखंडमधील हरिद्वारमध्ये २०२१ ला झालेल्या कुंभमेळ्यासाठी केंद्राने ५१७.५० कोटींचा निधी दिला होता. तर, २०१६-१७ मध्ये मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये झालेल्या कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकारने १०० कोटींचा निधी दिला होता. या तीनही कुंभमेळ्यांइतकेच मोठे धार्मिक महत्त्व नाशिकच्या कुंभमेळ्याला आहे. मात्र, नाशिकच्या कुंभमेळ्याकडे बघण्याची सरकारची दृष्टी 'छोटी' असल्यामुळे नाशिकचा कुंभमेळा या मंडळींना छोटा वाटतो.

नाशिकचा कुंभमेळा हा फक्त नाशिककरांचा उत्सव नाही, तर संपूर्ण देशातील कोट्यवधी हिंदू भाविकांचा तो श्रद्धेचा महाकुंभ आहे. मग या धार्मिक सोहळ्याला केंद्राकडून आर्थिक पाठबळ का मिळू नये? हिंदू धर्माची परंपरा फक्त उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेशातच आहे का? महाराष्ट्र हिंदूंचा प्रदेश नाही का?

हा नाशिकवर सरळसरळ अन्याय आहे. नाशिक हा काही भारताच्या धार्मिक नकाशावर अचानक उमटलेला एक ठिपका नाही. येथे कुंभमेळ्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. हिंदू धर्मग्रंथांमध्ये नाशिकच्या सिंहस्थाचे महत्त्व स्पष्टपणे सांगितले गेले आहे. मग नाशिककडे नेहमीच दुर्लक्ष का केले जाते?

स्व. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांनी नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी सढळ हस्ते दिला होता. तेव्हा केंद्र सरकारला नाशिकचे महत्त्व समजत होते, मग आता का नाही? त्यानंतरच्या प्रत्येक कुंभमेळ्यात या निधीत वाढ होणे अपेक्षित होते.

प्रत्यक्षात हिंदुत्वाच्या गप्पा मारणाऱ्या केंद्र सरकारने नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी 'फुटी कवडी'ही दिली नाही. हीच वेळ आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रातील आपले वजन वापरण्याची. ते जर केंद्र सरकारकडून हक्काचा निधी मिळवू शकले, तर सिंहस्थाचे स्वरूप अधिक भव्य, आकर्षक आणि ऐतिहासिकदृष्ट्या समृद्ध करता येईल.

# शाश्वत जीवनशैलीकडे परिवर्तनाची नांदी

**आजच्या आधुनिक जीवनशैलीत ग्राहकांच्या सवयींमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाला आहे. विजेचा अमर्याद वापर, अन्नाची नासाडी, प्लास्टिकच्या वस्तूंचा प्रचंड वापर आणि प्रदूषण यांसारख्या समस्यांमुळे पर्यावरणीय संकट वाढत आहे. १५ मार्च २०२५ रोजी जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त ह्यकंज्युमर्स इंटरनॅशनलह्ळ ही संघटना ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण आणि शाश्वत जीवनशैलीच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची मागणी करत आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या दैनंदिन सवयी बदलून शाश्वत जीवनशैली अंगिकारू शकते. पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.**




स्नेहलने स्वयंपाकघरातील काम आटोपले आणि ती बाहेर आली. पाहते तो दिवाणखान्यात पंखा आणि दिवे सुरू होते, टीव्ही सुद्धा सुरू होता, पण दिवाणखान्यात कुणीच नव्हते. स्नेहल चरफडली, विजेचा अमर्याद वापर तिला अस्वस्थ करून गेला. दिवाणखान्यातील कॉर्नर टेबलवर काल रात्री मुलांनी मागवलेल्या हॉटेलच्या अन्नाचे प्लास्टिक कंटेनर्स त्यातील शिल्लक अन्नासह तसेच पडून होते. अन्न वाया जात होते, रिकाम्या प्लास्टिकच्या कंटेनर्सनी उद्या कचऱ्यात भर पडणार होती. मुलांनी काय खावे आणि काय खाऊ नये हे त्यांना शिकविण्याच्या पलीकडे मुले गेलेली होती. रोजच्या बाहेरच्या खाण्याने मुलांच्या जीवनशैलीत फरक पडत होता. विजेच्या अमर्याद अनाठायी वापराने, ऊर्जेचे अनाठायी नुकसान होत होते. मुले त्यांच्या खोलीत एसी आणि पंखा दोन्ही लावून गाढ झोपली होती, आपण दिवाणखान्यात दिवे, टीव्ही वगैरे चालू ठेवून झोपलो आहोत, हे मुलांच्या गावीही नव्हते.

जगातील कित्येक देशांसाठी, मागील दशक हे उष्णतेच्या दृष्टीने उच्चांकी, तीव्र वातावरणीय बदलाचे आणि त्यायोगे जीवन आणि उपजीविकांवर परिणाम करणारे ठरले आहे. त्याचवेळी जैव-विविधतेचे नुकसान आणि प्रदूषण हे आपल्या सृष्टीला आणि आरोग्याला वाढता धोका दर्शविणारे ठरत आहे. यावरून एक निष्कर्ष असाही निघतो की, पर्यावरणीय धोके याला केवळ कारणीभूत नसून आपली सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुद्धा याला तितकीच जबाबदार आहे, जी आपल्या शाश्वत प्रगतीच्या जीवनमूल्यांवर परिणाम करत आहे- मारक ठरत आहे. आपल्या सृष्टीच्या मर्यादेत आपण नक्की कसे आपले जीवन कंठतो यात आपल्याला मूलभूत बदल करायला हवेत जसे आपले खानपान, आपल्या प्रवासाची साधने, आपल्या घरी आपण वापरत असलेली उष्णतेची-ऊर्जेची- वातानुकूलनाची साधने इत्यादी. १५ मार्च २०२५ च्या जागतिक ग्राहक हक्क दिनी 'कंज्युमर्स इंटरनॅशनल' आपले सहयोगी सभासद आणि भागीदारांसह शाश्वत जीवनशैलीकडे परिवर्तित होण्याकरिता ग्राहकांच्या हक्क आणि संरक्षण आणि सक्षमीकरणासाठी ठोस उपायांची मागणी करत आहे.

'दि लॅन्सेट'ने जून २०२२ च्या अहवालात असे नमूद केले की, २०१५ साली ९ दशलक्ष अकाली मृत्यूला प्रदूषण हे कारणीभूत होते. याला आपले अवाजवी औद्योगिकरण आणि घातक रसायनांचे प्रदूषण मुख्यतः जबाबदार आहे. मानवी उत्पत्तीचा कचरा हवेत, जमिनीवर, पाण्यात, समुद्रात सोडणे, त्याच्या परिणामांची पर्वा न करणे हे आपल्या जीवसृष्टीला घातक आहे. मागील दोन दशकांत मानवी मृत्यूचे प्रमाण वाढण्याला कारणीभूत असणारे प्रदूषण हे मुख्य कारण असून यात वातावरणीय वायू प्रदूषण आणि रासायनिक प्रदूषण हे दोन मुख्य घटक आहेत. प्रदूषणाच्या कारणाने होणारे ९० टक्के मृत्यू हे कमी उत्पन्न किंवा मध्यम उत्पन्न असणाऱ्या देशांत होतात. वायू प्रदूषण, शिसामुळे होणारे विषारी प्रदूषण आणि रासायनिक प्रदूषण हे टाळण्यासाठीच्या उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. याकरिता खालील मुख्य कारणांवर सक्रियतेने काम करण्याची गरज आहे.

- वायू प्रदूषण आणि त्याने आरोग्यावर होणारे परिणाम यावर लक्ष ठेवणे.
- शिशाच्या अमर्याद वापराने मुले आणि गर्भवती स्त्रिया यांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे ज्यावर नियंत्रण आणणे.
- पाणी आणि स्वच्छता विशेषतः मुली आणि स्त्रिया यांच्यात याबाबत जागरूकता निर्माण व्हायला हवी.
- रासायनिक प्रदूषणावर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे.

याबाबतीत जागतिक स्तरावर काम व्हायला हवे अशी व्यापक भावना व्यक्त होते आहे. ग्लोबस्कॅनने केलेल्या ३१ देशांतील सुमारे ३० हजार ग्राहकांच्या सर्वेक्षणातून असे व्यक्त झाले की साधारणपणे ९४ टक्के जणांना आपण शाश्वत जीवनशैलीकडे पाऊल टाकले पाहिजे. ८० टक्के जणांच्या मते सरकारे, उद्योग-व्यवसाय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी शाश्वत जीवनशैली सर्वसामान्यांना परवडेल, सहज उपलब्ध होईल अशा तऱ्हेने प्रयत्न करायला हवेत. गेल्या पाच वर्षांत राहणीमानाच्या खर्चात ज्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना त्यांच्या मूलभूत गरजा भागवणे सुद्धा कठीण होत आहे. या शाश्वत जीवनशैलीच्या उपलब्धतेसाठी खालील चतुःसूत्रीचा अवलंब व्हायला हवा असे वाटते :

- ग्राहकाच्या कायदेशीर-नियमित गरजांची कायमता-अन्न आणि ऊर्जेची उपलब्धता तसेच आरोग्य आणि सुरक्षेचे संरक्षण.
- शाश्वत आणि निरोगी पर्यायांची उपलब्धता-वैयक्तिक ग्राहकावर याची जबाबदारी न टाकता हे मिळायला हवे.
- शासकीय आणि औद्योगिक-व्यावसायिक पातळीवर सर्वसामान्य कमी उत्पन्न असणाऱ्या ग्राहकांचे म्हणणे सुद्धा ऐकले गेले पाहिजे.
- शाश्वत जीवनशैलीचे मार्ग कालानुरूप, भौगोलिकतेनुरूप बदलत जातील ज्यात एका स्थळाचे निकष दुसऱ्या स्थळास समान असतीलच असे नाही. स्थानिक प्राधान्ये आणि गरजा भिन्न असू शकतात.

शाश्वत जीवनशैली अंगिकारण्यासाठी मुंबई ग्राहक पंचायत नेहमीच आपल्या ग्राहक सभासदांना उद्युक्त करत असते. उपभोगावर संयम हे मुंबई ग्राहक पंचायतीचे सूत्र आपल्याला विविध प्रलोभनांपासून नेहमी दूर ठेवण्याचा प्रयत्न करत असते. आता ही ग्राहकाची जबाबदारी आहे की जागतिक तापमान वाढ, प्रदूषण वाढ यावर नियंत्रण आणण्यासाठी सरकार, उद्योग-व्यवसाय यांच्यावर दबाव वाढविला पाहिजे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे स्नेहलप्रमाणेच प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या सवयी शाश्वत जीवनशैलीला अनुकूल करायला हव्यात. आपला खारीचा वाटा उचलायला हवा. जेणेकरून आपल्या पुढील पिढ्या सुकर जीवनप्रवास करू शकतील.

# बॅंक खात्यातील किमान रकमेबाबत सेवा शुल्क

**आमच्याशेजारी ६५ वर्षांच्या काकूंची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करायची होती. त्यासाठी पुरेसे पैसे त्यांच्याकडे नसल्याने त्यांच्या बंगलोरच्या भावाने स्वतःच्या बॅंक खात्यातून काकूंच्या खात्यात शस्त्रक्रियेसाठी पैसे जमा केले. शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णालयात पैसे जमा करताना त्यांना बॅंक खात्यातून पुरेसे पैसे काढता आले नाहीत. याचे कारण म्हणजे अगोदर किमान रक्कम न राखल्याने, बचत खात्याच्या नियमानुसार बॅंकेने सेवाशुल्क कापून घेतले. परिणामी जेवढी रक्कम रुग्णालयाला भरायची होती, त्यापेक्षा कमी रक्कम खात्यामध्ये शिल्लक होती.**

भाजीवाल्याची वेगळीच कथा होती. इकडचा धंदा बंद करून तो परत आपल्या गावी जाणार होता. त्यापूर्वी इथले बॅंक खाते बंद करण्यासाठी तो बॅंकेत गेला असता, त्याच्या बचत खात्यात पैसे शिल्लक नसल्यामुळे त्याला खाते बंद करण्यापूर्वी सेवाशुल्क भरावे लागेल, असे बॅंकेत सांगितले गेले. जास्तीचे पैसे कशाला भरा म्हणून पठ्ठ्याने खाते बंद न करताच तो गावाला निघून गेला. अशा खात्यांचा वापर गैरव्यवहारासाठी होण्याची शक्यता बळावते. माझ्या मैत्रिणीचे तिच्या मुलीबरोबर संयुक्त बचत बॅंक खाते होते. चार महिन्यांपूर्वी मुलीचे लग्न झाले. एकदा कधीतरी तिने खात्यात किती शिल्लक आहे हे ऑनलाईन बघितले असता, त्या खात्यात निगेटीव्ह बॅलन्स दिसून आला. बरीच वर्षं काही व्यवहार केला नसल्याचे तिच्या लक्षात आले. बॅंकेत चौकशी केली असता, खात्यात किमान शिल्लक नसल्यामुळे दंड आकारला गेला असल्याचे तिला सांगण्यात आले.

गेल्या काही वर्षात बॅंकिंग सेवांचा प्रचंड विस्तार झाला. २४ तास आणि सातही दिवस बॅंकांची सेवा उपलब्ध झाली. डिजिटल व्यवहाराच्या सुविधेने व्यापक बदल झाला. जागतिकीकरण आणि आर्थिक सुधारणांच्या वेगामुळे बॅंकिंग क्षेत्रातील स्पर्धा झपाट्याने वाढली. नवनवीन साधने अस्तित्वात आली. खर्चिक तंत्रज्ञान, प्रशिक्षित स्टाफ आणि संपूर्ण यंत्रणा निर्माण करणे शिवाय सायबर सुरक्षा तयार करणे आवश्यक झाले. तत्परता, कार्यक्षमता व अद्ययावत सेवांसाठी वेगळे पैसे आकारण्याचे धोरण निर्माण झाले. आकर्षक सेवा-सुविधा मिळाल्यामुळे ग्राहकदेखील चार पैसे मोजू लागला. वाढलेल्या सुविधा आणि साधनांनुसार सेवा-शुल्क आकारणे गरजेचे असले तरी बॅंकांनी त्यांच्या ग्राहकांना मूलभूत सेवांसाठीच्या सर्व शुल्कांची माहिती देणे किंवा त्यामध्ये काही बदल झाल्यास त्याबाबतही माहिती देणे आवश्यक आहे. याशिवाय बॅंकांनी त्यांचे संपूर्ण तपशील त्यांच्या संकेतस्थळावर आणि मोबाइल ॲप्सवर सार्वजनिक करणे आवश्यक आहे. ही शुल्क रचना बॅंकेगणिक बदलू शकतात.

बॅंक आपल्या ग्राहकांना ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही सेवा पुरवते. यापैकी काही सेवा विनामूल्य आहेत, तर काहींसाठी सेवाशुल्क आकारले जाते. काही मोफत सेवांवरदेखील एका मर्यादेनंतर शुल्क आकारले जाते. उदाहरणार्थ, एटीएममधून पैसे काढण्याची कमाल मयार्दा निश्चित केली आहे. त्यापेक्षा जास्त वेळा एटीएममधून पैसे काढल्यास सेवा शुल्क आकारले जाते. तसेच बचत खात्यात शिल्लक असलेली रक्कम बॅंकेने निश्चित केलेल्या किमान मर्यादेपेक्षा कमी असल्यास दंड आकारला जाऊ शकतो. रिझर्व्ह बॅंकच्या विकासात्मक आणि नियामक धोरणानुसार ग्राहक हितार्थ एक एप्रिल २०१५पासून काही मार्गदर्शक तत्त्वे लागू झाली. त्यानुसार १. खात्यामध्ये किमान शिल्लक नसल्याचे खातेदाराला एसएमएस/ईमेल/पत्राद्वारे कळविण्यात आलेल्या तारखेपासून खातेदार विशिष्ट कालावधीत (एक महिन्यापेक्षा कमी नसावा) त्याची पूर्तता करू शकला नाही, तर त्याला सांगून बॅंक दंडाची रक्कम वसूल करू शकते. दंडाची रक्कम सेवेच्या खर्चाच्या प्रमाणात बॅंकेच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने ठरवलेली असावी. तसेच खात्यातील शिल्लक आणि बॅंकेने ठरवलेली किमान शिल्लक यांच्या फरकाच्या प्रमाणात दंडाची रक्कम निर्धारित केलेली असावी.

खात्यात किमान शिल्लक नाही म्हणून केवळ दंड आकारण्यात आल्यामुळे खात्यात निगेटिव्ह बॅलन्स दाखवू नये. काही बॅंका आपल्या नफ्यासाठी ह्या मार्गदर्शक तत्त्वांचा चुकीचा अर्थ लावून ग्राहकांचे शोषण करताना दिसतात. अशावेळी वेळी ग्राहकाने अनभिज्ञ न राहता नियमांबद्दल माहिती करून घेणे आवश्यक ठरते. बॅंक खात्यात निगेटिव्ह बॅलन्स होण्याच्या नियमांविषयी वेगवेगळ्या बॅंकांचे नियम वेगवेगळे असू शकतात. ग्राहक त्यांच्या बचत खात्यातील किमान शिल्लक रकमेचे विविध पद्धतींद्वारे निरीक्षण करू शकतात.

- **ऑनलाइन बॅंकिंग :** बॅंकेच्या संकेतस्थळाद्वारे तुमच्या खात्याच्या तपशीलांमध्ये प्रवेश करून चालू शिल्लक आणि व्यवहार इतिहास पाहणे.
- **मोबाईल बॅंकिंग ॲप :** तुमच्या स्मार्टफोनवर बॅलन्स आणि अलीकडील व्यवहार तपासण्यासाठी बॅंकेच्या मोबाईल ॲपचा वापर करणे.
- **एसएमएस अलर्ट :** तुमचा बॅलन्स एका विशिष्ट पातळीपेक्षा कमी झाल्यावर तुम्हाला सूचित करण्यासाठी टेक्स्ट मेसेज अलर्ट सेट करणे.
- **ईमेल सूचना :** खात्यातील व्यवहार आणि शिल्लक बदलांबाबत ईमेल अपडेट्स प्राप्त करणे.
- **बॅंक स्टेटमेंट :** अलीकडील व्यवहार आणि चालू शिल्लक तपासण्यासाठी बॅंक स्टेटमेंट नियमितपणे तपासणे.
- **एटीएम बॅलन्स चौकशी :** तुमच्या डेबिट कार्डचा वापर करून एटीएम मध्ये तुमचा बॅलन्स तपासणे.
- **फोन बॅंकिंग :** तुमच्या खात्यातील शिल्लक माहिती घेण्यासाठी बॅंकेच्या ग्राहक सेवा लाईनवर कॉल करणे.
- **बॅंकेच्या शाखेला भेट देणे :** बॅलन्स अपडेटची विनंती करण्यासाठी तुमच्या स्थानिक बॅंकेच्या शाखेला भेट देणे.

शुल्क टाळण्यासाठी तुमच्या विशिष्ट बचत खात्यासाठी आवश्यक असलेली किमान शिल्लक रक्कम जाणून घ्या. काही बॅंका फक्त एका दिवसाच्या क्लोजिंग बॅलन्सवर नव्हे तर सरासरी मासिक बॅलन्सवर आधारित आवश्यक किमान बॅलन्सची गणना करतात. म्हणून बॅंकेत खाते उघडताना, ते वापरताना किंवा कुठलेही आर्थिक व्यवहार करताना ग्राहकाने सजग आणि सतर्क राहणे आवश्यक असते.



# तूरडाळ पकोडा

**साहित्य :** १ वाटी तूरडाळ, १ कांदा बारीक चिरून, ४ ते ५ लाल मिरच्या, ४ ते ५ कडीपत्ता पाने बारीक चिरून, १ इंच आलेचा तुकडा किसून, चिटूभर हिंग, चवीपुरते मीठ, तेल तळण्यासाठी.

**कृती :** प्रथम तूरडाळ निवडून धुऊन घ्यावी. नंतर किमान दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. मिक्सर जारमध्ये लाल मिरची घालून त्याची पेस्ट बनवून घ्यावी. नंतर जारमध्ये निथळलेली तूरडाळ घालावी. त्यातच लाल स्नुमा मिरचीची पेस्ट घालून मिश्रण भज्याच्या पिठाप्रमाणे बनवून घ्यावे. आता तयार पीठ बाऊलमध्ये काढून त्यात बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता, आले, हिंग आणि मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करून पंधरा मिनिटे झाकून ठेवावे. आता गॅसच्या मध्यम आचेवर कढईत तेल गरम करावे. भज्याचे पीठ परत एकदा हातानेच मिक्स करावे. आच मंद करून भज्याचे पीठ गरम तेलात सोडावे. भजी हलक्या सोनेरी रंगावर आणि कुरकुरीत झाली की, पेपर नॅपकीनवर काढावीत. म्हणजे जादाचे तेल शोषले जाईल. आता तयार गरम तूरडाळ पकोडा चटणी अथवा केचपसोबत खाणस द्या.

# नेलपेंटचा रंग दर्शवतो तुमची पर्सनॅलिटी

**नखं छान दिसावीत म्हणून आपण नखांना अगदी हमखास नेलपेंट लावतो. हल्ली तर इतक्या निरनिराळ्या प्रकारच्या आणि रंगाच्या नेलपेंट्स बाजारात मिळतात की, कोणता रंग आपण लावावा, असा प्रश्न हमखास अनेकांना पडतो. पण तरीही कितीही पेचात असलो तरी शेवटी आपण आपल्या आवडीचा रंग निवडत असतो. तुमच्या नेलपेंटचा रंग तुमची पर्सनॅलिटी दर्शवत असतो. जाणून घेऊया नेमका तुमच्या आवडीचा नेलपेंटचा रंग तुमच्या पर्सनॅलिटीविषयी काय सांगतो ते...**



**गोल्डन/सिल्व्हर रंग :** काहींना ग्लिटरी रंग लावायला आवडतात. असे रंग लावणाऱ्या व्यक्ती कायमच आकर्षित करणाऱ्या असतात. त्यांना कायम लोकांनी आपल्याकडे पाहत राहावे असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्व तसे असल्यामुळे तसे होतेसुद्धा म्हणा. गोल्डन, सिल्व्हरचे शेड लावणारे लोक म्हणूनच थोडे खास असतात.

**लाल रंग :** काहींना लाल रंगाच्या शेड्स इतक्या आवडतात की, तुम्हाला कायम त्यांच्या बोटांना लाल रंगाचीच नेलपेंट दिसून येते. लाल रंगामुळे तुमची बोटं अगदी चार चौघात उठून दिसतात. असे व्यक्ती फार सेक्सी, धाडसी असतात. कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची त्यांची तयारी असते.



**काळा रंग :** हल्ली खूप जण काळ्या रंगाची नेलपेंट लावताना दिसतात. काळा रंग हा ट्रेंडमध्ये असला तरी त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. काळ्या रंगाची नेलपेंट लावणारे लोक कलात्मक असतात. म्हणजे त्यांना कला क्षेत्राची आवड अधिक असते. फॅशन, संगीत अशा क्षेत्रात काम करणारे व्यक्ती असतात. काळा रंग जरी त्यांची पर्सनॅलिटी खुलवत असेल तरी अशी लोक मनाने फारच हळवी असतात.

**गुलाबी रंग :** आता महिलांना सर्वसाधारणपणे नेलपेंटसाठी आवडणारा रंग म्हणजे गुलाबी. आता या गुलाबी रंगातही बरेच शेड्स आहेत. म्हणजे तुम्ही हॉट पिंक हा शेड लावत असाल,तर तुम्ही बोल्ड विचारांचे असता. त्यांच्यातील सद्सद्विवेकबुद्धी चांगली असते. तर फिकट गुलाबी रंग लावणारे हळव्या मनाचे असतात. त्यांना इतरांची काळजी घ्यायला खूप आवडते. अशा व्यक्तींना इतरांची काळजी फार असते.



**निळा रंग :** हल्ली निळा रंगाच्या नेलपेंट्स लावायला अनेकांना आवडते. निळा रंग शांतता आणि सामंजस्याचे प्रतीक असते. अशा व्यक्ती शांत आणि समजूतदार असतात. त्यांना त्याच्या नियमानुसार वागायलाच आवडते. त्यामुळे कोणताही अन्य मार्ग स्वीकारायला तयार नसतात.

**निऑन रंग :** थोडेसे भडक असे निऑन रंग असतात. त्यामध्ये वेगवेगळ्या रंगाची शेड असते. नवीन आयडियाज आणि नवीन आव्हानांसाठी ही लोक तयार असतात. या लोकांमध्ये कमालीची ऊर्जा असते. यांना नेहमी नव्या कल्पना सुचतात.

**न्यूड रंग :** नखांचा रंगाला जाईल असे रंग म्हणजे न्यूड रंग खूप जणांना आवडतात. अशा व्यक्ती फार स्थिर असतात. त्यांना त्यांच्या तत्त्वांना चिकटून राहायला आवडते. त्यांना त्यांचा क्लास मेंटेन करायला आवडते.

# मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या सततच्या वापराने शरीरावर होऊ शकतात दुष्परिणाम?

**आपण संपूर्ण दिवसभरात अनेक प्रकारची गॅजेट्स वापरत असतो. या गॅजेट्समार्फत जगभरातील घडामोडी अगदी घरबसल्या आपल्याला समजत असतात. पण या गॅजेट्सच्या सतत वापराचा परिणाम आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारे होऊ शकतो. गॅजेट्सच्या आहारी गेल्याने निद्रानाशासारखे त्रास जाणवू लागल्याचे आपण अनेकदा ऐकत असतो, पण या गॅजेट्समुळे आपल्या शरीरावरही अनेक प्रकारचे दुष्परिणाम होत असतात, याचा विचार करणेही अगत्याचे आहे.**

काही व्यक्तींना मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहताना सतत डोळे बारीक करून पाहण्याची सवय असते. त्यामुळे डोळ्यांच्या अवतीभोवती सुरकुत्या पडू लागतात, तसेच डोळ्यांवरही सतत ताण जाणवू लागतो. त्यामुळे स्क्रीनकडे बघताना डोळे बारीक करून बघणे टाळावे. कॉम्प्युटर किंवा मोबाइल आपल्या शरीराच्या खूप जवळ ठेवणे हे टाळावे. या गॅजेट्समधून बाहेर पडणारे रेडिओमॅग्नेटिक किरण आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. तसेच कॉम्प्युटर किंवा मोबाइल स्क्रीनमधील अल्ट्रा व्हायोलेट किरणांमुळे त्वचा आणि डोळे या दोहोंना अपाय होऊ शकतो.कॉम्प्युटर वर काम करताना आपण वापरतो ती खुर्ची आरामदायक असेल असे पहावे. काही व्यक्तींना दिवसभर कॉम्प्युटरवर काम करावे लागते, त्यांनी या गोष्टीची विशेष काळजी घ्यावी. खुर्ची बसण्यास आरामदायक नसेल, तर त्याचा ताण पाठीच्या मणक्यांवर जाणवायला लागून, पाठदुखीचा त्रास सुरू होऊ शकतो. तसेच सतत बसून काम केल्याने पायांकडे होणारे रक्ताभिसरण व्यवस्थित न होऊन, पायांवर सूज येऊ लागते. असे होऊ नये म्हणून थोड्या थोड्या वेळाने जरासे पाय मोकळे करण्यासाठी ऑफिस मध्येच किंवा घरातल्या घरात पायी चालावे किंवा लिफ्टऐवजी जिन्यांचा वापर करावा. अनेक व्यक्तींना मोबाइल फोन खांद्याच्या व कानाच्या मध्ये धरून, एकीकडे काम करत बोलण्याची सवय असते. अशा पद्धतीने जास्त वेळ बोलत राहिल्यास मानेचे दुखणे उद्भवू शकते. तसेच कॉम्प्युटरवर खाली मान झुकवून काम करत असल्यासही मानदुखीचा त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे कॉम्प्युटरचा स्क्रीन नेहमी आपल्या डोळ्यांसमोर असेल अशा पद्धतीने ठेवायला हवा.

रात्री झोपायच्या अर्धा तास आधीपासून कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा वापर करणे थांबवावे. त्याऐवजी मन शांत करणारे आपल्या आवडीचे एखादे चांगले पुस्तक वाचावे, किंवा शांत संगीत ऐकावे. त्यामुळे शांत झोप लागण्यास मदत मिळते.



# खास फीचरसह लॉक करा तुमचं सिमकार्ड, फोन हरवल्यावर किंवा चोरी झाल्यावर देखील राहील सुरक्षित

**जर तुम्हाला तुमचा फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर सिमकार्ड किंवा नंबरचा गैरवापर टाळायचा असेल, तर सिमकार्ड लॉक करता येईल. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्हीमध्ये मिळत आहे.**

स्मार्टफोन्समध्ये कितीही फीचर्स असले तरी त्यात खरा जीव सिमकार्ड टाकल्यावर येतो. कॉलिंग असो किंवा एसएमएस आणि मोबाइल डेटाचा वापर करण्यासाठी सिमकार्डची आवश्यकता असते. विशेष म्हणजे तुम्ही हवं असल्यास तुमचं सिमकार्ड लॉक करू शकता, त्यामुळे फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर त्याचा गैरवापर करता येत नाही.

स्मार्टफोनवर लॉक सेटअप करतो तसं सिमकार्ड पण लॉक करता येतं. जर तुम्ही हे फीचर इनेबल केलं, तर सिमकार्डचा गैरवापर करता येणार नाही. कोणीही दुसरा युजर तुम्ही सेट केलेला पिन एंटर केल्याविना सिम वापरू शकणार नाही. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्ही डिवाइसेजमध्ये सहज इनेबल करता येतं.

### अँड्रॉइड फोनमध्ये असं लॉक करा सिम

- सर्वप्रथम सेटिंग्स ओपन करा आणि मग सिक्युरिटी सेटिंग्स मध्ये जा.
- तिथे सर्वात खाली स्क्रोल केल्यावर मोअर सेटिंग्स वर टॅप करा.
- त्यानंतर सिमकार्ड लॉकची निस्वाद करा आणि पिन सेटअप करा.
- पहिल्यांदा तुम्हाला डिफॉल्ट पिन एंटर करावा लागेल आणि त्यानंतर नवीन पिननं सिमकार्ड लॉक करण्याचा पर्याय मिळेल.
- वेगवेगळ्या टेलिकॉम ऑपरेटर्सचा डिफॉल्ट पिन वेगवेगळा असतो. नवीन पिननं सिमकार्ड लॉक केल्यावर पिन एंटर केल्याविना सिम कार्डचा वापर करता येणार नाही.



### आइओएस डिव्हाइसमध्ये असं लॉक करा सिम

- तुमच्या आयफोनच्या सेटिंग्स मध्ये जा आणि तिथे मोबाइल डाटा वर टॅप केल्यावर सिम पिनचा पर्याय निवडा.
- त्यानंतर डिफॉल्ट पिन एंटर करूनच तुम्हाला पुढे जात येईल.
- पुढे तुम्हाला चेंज पिन ऑप्शनवर टॅप केल्यावर तुमचा नवीन पिन एंटर करावा लागेल, म्हणजे सिम कार्ड लॉक होईल.
- हा पिन एंटर केल्याविना सिमकार्ड वापरता येणार नाही. फोन रीस्टार्ट केल्यावरदेखील हा पिन टाकावा लागेल.

## उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी

# जीवनशैलीत करा हे बदल

**आजकाल** प्रत्येक वयोगटातील व्यक्तीला उच्चदाबाचा त्रास होताना दिसत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी, चुकीची जीवनशैली, अधिक मिठाचं सेवन करणं किंवा तणावामुळे अनेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. उच्च रक्तदाबमुळे (हाय ब्लडप्रेशर) हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. त्यामुळे स्वस्थ राहण्यासाठी आपला रक्तदाब नियंत्रणात असणं गरजेचं आहे. उच्च रक्तदाबाची काही तशी खास लक्षणं नसल्याने तो हळूहळू शरीरात प्रभावित होत जातो. ही समस्या दूर करण्यासाठी दैनंदिन दिनचर्या सुरळीत ठेवणं, त्यात काही आवश्यक चांगले बदल करणं महत्त्वाचं आहे.

उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचं सेवन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय लो फॅट डेअरी उत्पादने, सुकामेवा, कडधान्यं यासारख्या पदार्थांचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.

जेवणात मिठाचं प्रमाण कमी केल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. जे लोक दिवसांतून १५०० एमजीहून कमी मिठाचं सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. खाताना कधीही अन्नपदार्थांवरून मीठ टाकू नये.

वजन वाढल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या होते. त्यामुळे कॉलेस्ट्रॉल आणि मधुमेह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या उंचीप्रमाणे आपलं वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे.

नियमित व्यायाम करणं सर्व आजारांवर सर्वोत्तम उपाय आहे. व्यायामामुळे तणाव कमी करण्यासही मदत होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. दररोज ३० मिनिटं व्यायाम करणं उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.



# तजेलदार त्वचेसाठी आवश्यक आहे हे व्हिटॅमिन्स...

**ड्राय आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी आपला आहार जबाबदार आहे. पर्याप्त पोषण मिळाल्यावर आपलीही त्वचा तजेलदार होऊ शकते. तसे तर विभिन्न त्वचेसाठी वेगवेगळ्या आहाराची गरज असते परंतु निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी आपल्या आहारात हे व्हिटॅमिन्स असणे गरजेचे आहे. पाहू ग्लोइंग स्किनसाठी आवश्यक व्हिटॅमिन्स...**



**सर्वप्रथम** आपल्याला भरपूर पाणी प्यायला हवं. पाणी स्किनसाठी सर्वश्रेष्ठ औषधी आहे. पाणी आपल्या पूर्ण शरीराला रिफ्रेश करतं आणि आपल्या त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं. ज्या प्रकारे शरीराला ऑक्सिजनची गरज आहे त्या प्रकारे स्किनसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे व्हिटॅमिन्स आपल्या त्वचेला तजेलदार ठेवण्यात मदत करतील :

**व्हिटॅमिन सी :** हे रसदार फळांमध्ये आढळतं जसे संत्रं, लिंबू आणि मोसंबी

**व्हिटॅमिन ए :** याचे मुख्य स्त्रोत आहे- पपई, संत्रं, एग यॉर्क

**व्हिटॅमिन बी :** हे फळांसह सर्व पालेभाज्यांमध्ये आढळतं

**व्हिटॅमिन इ :** हे शेंगदाणे आणि इतर ऑइल सीड्समध्ये आढळतं.

# पायांच्या सुजण्यावर कोरफड एकच रामबाण उपाय



पायांना सूज येण्यामागे अनेक कारणे आहेत. अधिक काळ उभे राहणे, पायाला काही दुखापत होणे, पायामधून रक्त येणे इ. त्यामुळे पायांच्या दुखण्याच्या समस्या वाढतात. चालताना देखील अनेक त्रास होतो. अशा त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी लोक औषधांचा वापर करतात. औषधांच्या वापरामुळे योग्य फायदा होत नाही. त्यासाठी एक घरगुती उपाय नक्कीच करून पाहा. कोरफडच्या वापरामुळे ही समस्या कमी होण्याची शक्यता आहे. आपल्या रोजच्या जीवनात कोरफडचे अनेक फायदे आहेत.

**कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात**

कोरफडमध्ये व्हिटॅमिन्स, एन्जाइम्स, सॅलिसिलिक ॲसिड, ॲण्टीऑक्सिडेंट, मिनरल्स, अमीनो ॲसिड हे पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. कोरफडच्या पाण्यात काही वेळ पाय ठेवल्यास अत्यंत फायदा होतो. लागणारे साहित्य

- कोमट पाणी कोरफडचा गर मॉइश्चराइजर

एका बादलीमध्ये कोमट पाणी घ्या, त्यामध्ये कोरफडचा गर एकजीव करून घ्या. आता या पाण्यात अर्ध्या तासासाठी पाय राहू द्या. काही वेळा नंतर पायांना मॉइश्चराइजर लावा.

# पोटाच्या कर्करोगासाठी हळद फार उपयुक्त

**आपल्या** दैनंदिन जीवनात हळदीचा वापर होत असतो. हळदीचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी नाही तर इतर कामांसाठी सुद्धा फायदेशीर ठरतो. हळद ज्याप्रमाणे जेवणाला चवदार बनवते त्याचप्रमाणे ती आरोग्यास अत्यंत लाभदायक आहे. फक्त किरकोळ आजारांसाठी हळद फायदेशीर नाही, तर गंभीर आजारावरसुद्धा हळद महत्त्वाची भूमिका बजावते. कक्यूर्मा लॉन्गा (हळदीचे झाड) यांच्या मुळांमधून निघणाऱ्या करक्युमिन पोटामध्ये होणाऱ्या कर्करोगास रोखण्यास मदत करतो.



फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ साओ पाउलो (युनिफासएसपी) आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरा (यूएफओ)च्या संशोधकांनी ही माहिती ब्राझिलमध्ये प्रदान केली आहे. कर्क्यूमिन व्यतिरिक्त, हिस्टोन क्रियाकलाप सुधारित करण्यासाठी इतर यौगिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यात कोल्काल्सी फेरॉल, रेव्हरेट्रॉलोल, क्वार्सेटिन, गार्सनॉल आणि सोडियम बटायट्रेट (आहारातील फायबरच्या निषेधा नंतर आतड्यातील बॅक्टेरियाद्वारे उत्पादित) यांचा समावेश असतो. ग्लोबल कॅन्सर रिसर्च इंटरनॅशनलच्या पोटाच्या कर्करोगाच्या आकडेवारीनुसार, जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी एकूण ९ लाख ५२ हजार गॅस्ट्रिक कर्करोग्रस्त रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये अंदाजे ७ लाख २३ हजार रुग्ण कर्करोगाने बळी पडतात. म्हणजे एकूण ७२ टक्के रुग्ण या गंभीर आजाराचे शिकार होतात.

भारत देशात पोटाचा कर्करोग झाल्याची रुग्णांची संख्या सुमारे ६२ हजार एवढी आहे. त्यामध्ये ८० टक्के रुग्ण प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. याबाबतीत हेल्थ केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.के. के.अग्रवाल यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 'पोटाचा कर्करोग हळूहळू विकसित होतो. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही लक्षणे समोर येत नाहीत.' पोटाच्या कर्करोगाच्या सामान्य लक्षणांमध्ये भूक कमी लागणे, वजन कमी होणे, पोटात दुखणे, अपचन होणे, उल्टी होणे (रक्ताची उल्टी होण्याची शक्यता), पोटाला सुज येणे इ. यापैकी काही लक्षणांवर रुग्ण तत्काळ उपचार घेतो. कारण हे लक्षणे दिसण्यात येतात. परंतु उपचारानंतरही हे आजार कायम राहतात.

कर्करोगाच्या उच्च दराचे प्रमुख कारण म्हणजे, यांत्रिक युगात तणावाचे प्रमाण वाढले आहे. धूम्रपान करणे आजाराचे प्रमुख कारण आहे. पोटाच्या कर्करोगासाठी योग्य वेळी योग्य उपचार घेते महत्त्वाचे आहे. डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पहिल्या काही वर्षांमध्ये ३ ते ६ महिने सतत डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते, असे वक्तव्य डॉ. के.के. अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

# जांभूळ खा आणि तंदुरुस्त राहा

- जांभळामध्ये असलेल्या मधुमेहविरोधी गुणधर्मामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. जांभळामुळे रक्तातील स्टार्च आणि साखरेचं रूपांतर ऊर्जेमध्ये होतं.
- जांभळाच्या फळासोबतच जांभळाच्या बियांची पावडर, जांभळाच्या झाडाची साले, जांभळाचा रस याचाही मधुमेहाच्या उपचारात चांगला उपयोग होतो.
- जांभळाच्या झाडाच्या सालाची आणि बियांची पावडर पोटाच्या विकारावर गुणकारी असते. डायरिया, अपचन, जुलाब यासारख्या आजारात ती फायदेशीर ठरते.
- जांभूळ नैसर्गिकरीत्या रक्त शुद्ध करते. जांभळामध्ये मोठ्या प्रमाणावर लोह म्हणजेच आर्यन असतं. त्यामुळे जांभूळ खाल्ल्यानेही रक्तातील हिमोग्लोबीन वाढतं.
- जांभळात मोठ्या प्रमाणात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वं असतं. तसेच खनिजंही असतात त्याचा उपयोग डोळ्यांचं आणि त्वचेचं आरोग्य सुदृढ ठेवण्यास होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.
- जांभूळ थंड फळ असल्यानं पोटातील आग आणि अपचन यावर उपयोगी असतं.
- जांभूळ खाल्ल्यानं दात आणि हिरड्या मजबूत होतात. तसेच दात आणि हिरड्यात संसर्ग होत नाही.
- जांभळाच्या बियांची पावडर गायीच्या दुधात मिक्स करून हा लेप चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरच्या मुरुम, पुटकुळ्या निघून जातात.



- ज्यांना भूक लागण्याची समस्या आहे त्यांनी जांभळाचं व्हिनेगर/ सिरप दिवसातून दोन ते तीन वेळेस पाण्यासोबत समप्रमाणात घेतल्यास भूक वाढते.
- जांभळाच्या ज्यूसचा उपयोग अशक्तपणा, ॲनेमिया यावरही होतो. तसेच जांभळाच्या ज्यूसच्या नियमित सेवनानं स्मरणशक्ती वाढते.

# लिव्हर (यकृत)साठी घरगुती उपाय गुणकारी

**स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.**



- आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या आवळ्यामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.
- जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.
- जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४-५ पाने दररोज चावून चावून खात.
- जवसाच्या बियांमध्ये साइटोकॉर्न्स-टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.
- बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात.

# कोकण विभागात ८ हजार ५०० कोटींची गुंतवणूक
# उद्योजकांची पसंती ठाणे जिल्ह्याला

**■ठाणे :** उद्योग वाढींसाठी आणि नव्याने रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी अत्यंत महत्वाची असलेली कोकण विभागीय गुंतवणुक परिषद नुकतीच ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या परिषदेच्या माध्यमातून तब्बल ८ हजार ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले असून याद्वारे ७२ हजार रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तर यामध्ये उद्योजकांकडून ठाणे जिल्ह्याला पसंती देण्यात आली असून ४ हजार कोटींची गुंतवणूक ही एकट्या ठाणे जिल्ह्यात करण्यात आली आहे.

कोकण विभागातील विविध जिल्ह्यांना केंद्रस्थानी ठेऊन गुंतवणूक आकर्षित करणे, गुंतवणूकदार तसेच व्यावसायिकांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, विभागातील प्रत्येक जिल्ह्याला अधिकाधिक निर्यातक्षम बनविण्यासाठी उद्योग संचालनालय, मुंबई अंतर्गत व उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंग कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हा नियोजन भवन येथे ह्लकोकण विभागीय गुंतवणूक



परिषदह्ण आयोजित करण्यात आली होती. या गुंतवणूक परिषदेचे उद्घाटन कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेच्या माध्यमातून विभागामध्ये ८ हजार ५०० कोटी इतकी गुंतवणूक होणार असून त्या माध्यमातून ७२ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत.

कोकण विभाग हा भौगोलिक व आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असून नवीन गुंतवणुकीसाठी अनुकूल आहे. राज्यात पायाभूत सोयी सुविधा, समृध्दी महामार्ग, वाढवण बंदर निर्मिती यामुळे निर्यातीस प्रोत्साहन मिळत असून भविष्यात कोकण लॉजिस्टिक्स व शिपिंग हब म्हणून उदयास येईल.असे मत यावेळी विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

या परिषदेच्या अनुषंगाने कोकण विभागात एकूण ३३१ नामांकित उद्योग घटकांनी शासनासोबत सामंजस्य करार केले. या सामंजस्य करारान्वये कोकण विभागात ८ हजार ५०० कोटी इतकी गुंतवणूक होणार असून त्यामध्ये ७२ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. या परिषदेमध्ये झालेल्या सामंजस्य करारापैकी काही उद्योगांना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात सामंजस्य कराराचे वाटप करण्यात आले.

# कल्याणमधील काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा शिंदे शिवसेनेत प्रवेश

**■कल्याण :** कल्याणमधील काँग्रेसचे प्रदेश नेते आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्या उपस्थितीत शिंदे शिवसेनेत प्रवेश केला. कल्याण जिल्हा काँग्रेसमधील अंतर्गत राजकारण, ठराविक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनाच मानाची पदे देण्याची स्पर्धा या कुरघोडीच्या राजकारणाला कंटाळून आम्ही शिंदे शिवसेनेत प्रवेश केला आहे, असे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी



सदस्य पॉली जेकब यांनी सांगितले.

मागील २० वषार्पासून आम्ही कल्याण जिल्हा काँग्रेस समितीमध्ये निष्ठेने सक्रिय पध्दतीने काम करत आहोत. पक्षाच्या आदेशाप्रमाणे आम्ही वेळोवेळी काँग्रेस पक्षासाठी, काँग्रेसचे उमेदवार निवडून आणण्यासाठी काम केले. पक्षाचे मोर्चे, आंदोलनात सहभाग घेतला. आम्हाला कधीही स्थानिक नेतृत्वाने मानाची पदे दिली नाहीत.

# कल्याण पूर्वेत पथकप्रमुख भगवान पाटील फेरीवाल्यांचा हप्ता घेताना कॅमेऱ्यात कैद, कारवाईचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांचे आदेश



**■कल्याण :** कल्याण पूर्वेतील कल्याण डोंबिवली पालिकेच्या जे प्रभागातील फेरीवाला हटाव पथकातील पथक प्रमुख भगवान पाटील फेरीवाल्यांची पाठराखण करण्यासाठी एका व्यक्तिकडून जे प्रभाग कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर पैसे स्वीकारत असल्याची दृश्यध्वनी चित्रफित समाजमाध्यमांवर प्रसारित झाली आहे. या दृश्यध्वनी चित्रफितीची पालिकेच्या वरिष्ठांनी गंभीर दखल घेतली आहे.

कल्याण पूर्व भागात पालिकेच्या जे प्रभागात भगवान पाटील हे फेरीवाला हटाव पथकात पथक प्रमुख म्हणून काम करतात. कल्याण पूर्व जे प्रभाग हद्दीतील फेरीवाल्यांना हटविण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. परंतु, पथक प्रमुख भगवान पाटील हे दृश्यध्वनी चित्रफितीमध्ये जे प्रभागाच्या कार्यालयाच्या प्रवेशव्दारावर उभे राहून दुचाकीवरून आलेल्या व्यक्तिकडून फेरीवाल्यांची पाठराखण करणे आणि जे फेरीवाले पैसे देत नाहीत त्यांच्यावर कारवाई करणे या कामासाठी पैसे स्वीकारत असल्याचे दिसत आहे. जे फेरीवाले पैसे देत नाहीत त्यामुळे हप्ता कमी पडत असल्याने आपण दिलेल्या रकमेत पंधराशे रुपए टाकले आहेत, असे पैसे देणारी व्यक्ति बोलत असल्याचे दृश्यध्वनी चित्रफितीमध्ये दिसत आहे.

ही दृश्यध्वनी चित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित होताच आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतली. अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी माध्यमांना सांगितले, दृश्यध्वनी चित्रफितीमध्ये जे प्रभागातील कर्मचारी भगवान पाटील हे काही आक्षेपार्ह गोष्टी करत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. या प्रकरणी भगवान पाटील यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल. खुलाशातील त्यांचे मत पाहून त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

भगवान पाटील हे यापूर्वी डोंबिवलीतील फ प्रभागात फेरीवाला हटाव पथकात कार्यरत होते. त्यावेळीही त्यांच्यावर फेरीवाल्यांच्या पाठराखण करण्याविषयीच्या अनेक तक्रारी पालिकेत येत होत्या. जे प्रभागात कार्यरत असताना फेरीवाल्यांच्या विषयावरून एक ते दोन वेळा अडचणीत येण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला होता, पण त्यातून ते कारवाईच्या कचाट्यातून थोडक्यात बचावले होते, असे काही वरिष्ठ पालिका अधिकारीच सांगतात.

काही माजी वजनदार नगरसेवकांचे आपण खास आहोत, असे सांगून ते प्रभागात वावरत असतात. यापूर्वी काही साहाय्यक आयुक्त भगवान पाटील यांना आपल्या प्रभागात फेरीवाला हटाव पथकात पाठवा म्हणून नेहमीच वरिष्ठांकडे रदबदली करण्यासाठी धडपडत असत, अशीही चर्चा पालिका मुख्यालयात आहे. भगवान पाटील यांच्या यापूर्वीच्या आणि आता ते एका दृश्यध्वनी चित्रफितीमध्ये पैसे स्वीकारताना आढळून आल्याने आयुक्तांनी त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# राज्यात ७० टक्के बनावट पनीरची विक्री
## सत्ताधारी आमदाराचा सरकारला घरचा आहेर

**■मुंबई :** राज्यात विक्री होणाऱ्या पनीरपैकी ७० टक्के पनीर बनावट असून, नागरिकांच्या जीवाशी खेळले जात असल्याचा घरचा आहेर बुधवारी सत्ताधारी पक्षातील आमदाराने सरकारला दिला. त्यावर बनावट किंवा कृत्रिम पनीर हे निश्चितच नागरिकांच्या आरोग्यासाठी धोक्याचे आहे. हे पनीर विक्री करीत असलेल्या विक्रेते व संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

ॲनालॉग चीज हा पदार्थ राज्यात ॲनालॉग, कृत्रिम किंवा बनावट पनीर या नावाने विक्री केला जात असल्याबाबत विक्रम पाचपुते, सुधीर मुनगंटीवार, कैलास पाटील आदी सदस्यांनी लक्षेवधी सूचना मांडली होती. सदस्य विक्रम पाचपुते यांनी याबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. दुधाऐवजी वनस्पती तूप वापरून बनविण्यात येणारा ॲनालॉग चीज हा



पदार्थ राज्यात पनीरच्या नावाने राजरोसपणे विक्री केली जातो. राज्यात दररोज विक्री होणाऱ्या पनीरपैकी ७० ते ७५ टक्के प्रमाण हे ॲनालॉग चीजते असते. ॲनालॉग चीज पनीर म्हणून विक्री होत असल्याने दुग्ध व्यवसायावरही विपरित परिणाम होत असून लोकांचीही फसवणूक केली जात असल्याचा आरोप सदस्यांनी केला.

त्यावर उपमुख्यमंत्री पवार यांनी 'अनॉलॉग चीज'च्या नावाखाली कृत्रिम पनीर किंवा बनावट पनीर विक्रीबाबत संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच या विषयातील तज्ञ व्यक्तींची बैठक घेऊन कायद्यात सुधारणा करण्यात येईल.फेक पनीरची विक्री, साठवणूक व वाहतुकीविरोधात कारवाई करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या नियमांमध्ये सुधारणा करून ते अधिक कठोर करण्यात येतील. तसेच केंद्र शासनाच्या नियमांमध्ये बदल करण्यास संबंधित केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा करून त्यांना विनंती करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत अशा पनीर विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशाराही पवार यांनी दिला.

# दिवा रुग्णालयाचा मार्ग खडतर?
## २ वर्षांपुर्वी राज्य शासनाकडून निधी मिळूनही भुसंपादन नाही

**■ठाणे :** महापालिकेच्या वेशीवर असलेल्या दिवा परिसरात रुग्णालय उभारण्याकरीता आवश्यक असलेल्या भूसंपादनासाठी राज्याच्या नगरविकास विभागाने ५८ कोटी रुपयांचा निधी दोन वर्षांपुर्वी मंजूर केला असून या रुग्णालयाची घोषणा यंदाच्या अर्थसंकल्पात करणाऱ्या ठाणे महापालिकेला रुग्णालयाच्या जागेसाठी अद्याप भुसंपादन करणे शक्य झालेले नाही. नागरीकांच्या विरोधामुळे भुसंपादनात अडचणी येत असल्याचे पालिकेचे म्हणणे असून या संदर्भात ठाणे महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच पत्र पाठवून रुग्णालयाची गरज लक्षात घेऊन येथील भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले आहे.



ठाणे महापालिकेच्या वेशीवर असलेल्या दिवा परिसराची लोकसंख्या चार ते पाच लाखांच्या आसपास आहे. दिवा शहरातील नागरिकांना आरोग्य सेवेसाठी ठाणे, मुंबई तसेच इतर मोठ्या शहरात जावे लागते. या पार्श्वभूमीवर पालिकेने दिवा शहरात सात ठिकाणी 'वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू केले आहेत. या दवाखान्यात नागरिकांना मोफत तपासणी औषध दिली जातात. या दवाखान्यात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्यादेखील खूप मोठी आहे. परंतु पुढील उपचारासाठी नागरिकांना इतर शहरांमध्ये जावे लागत आहे. त्यामुळे दिव्यात रुग्णालय उभारणीची मागणी होत होती. हि बाब लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन वर्षांपुर्वी मुख्यमंत्री पदाच्या काळात राज्याच्या नगरविकास विभागामार्फत दिवा परिसरात रुग्णालय उभारण्याकरीता आवश्यक असलेल्या भूसंपादनासाठी ५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. हा निधी पालिकेला प्राप्त झाला असून त्याचा उल्लेख यंदाच्या अर्थसंकल्पात ठाणे महापालिकेने केला आहे.

दोन वर्षांपुर्वी निधी मिळूनही ठाणे महापालिकेला दिवा रुग्णालयाच्या जागेसाठी भुसंपादन करणे शक्य झालेले नाही. दिवा येथील आगासन भागातील २५ हजार चौरस मीटर क्षेत्रावर १०० खाटांचे रुग्णालय उभारण्याचे पालिकेचे नियोजन आहे. टीडीआर स्वरुपात मोबदला देण्याचा प्रस्ताव पालिकेने बाधितांपुढे ठेवला होता. मात्र, त्यास बाधितांनी नकार दिल्यानंतर पालिकेने रोख रक्कम स्वरुपात मोबदला देण्याचा निर्णय घेऊन तसा प्रस्ताव पालिकेने राज्य शासनाला पाठविला होता. त्यानुसार राज्य शासनाने भुसंपादनासाठी ५८ कोटी रुपये दिले होते. या जागेच्या भुसंपादनासाठी सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. मात्र, त्यास काही नागरिकांच्या विरोधामुळे सर्वेक्षण प्रक्रीया रखडली आहे. सर्वेक्षणाशिवाय मोबदला देऊन भुसंपादन करता येत नसल्याने रुग्णालयाचा मार्ग खडतर असल्याचे चित्र आहे.

दिवा, आगासन भागातील १३.८७ हेक्टर जागेवर विविध कार्यालये उभारण्याचे पालिकेचे नियोजन आहे. यामध्ये रुग्णालय, प्रभाग समिती कार्यालय, अग्निशमन केंद्र, पोलीस स्टेशन, बसथांबा, १५ मीटर रस्ता, संप पंप हाऊस तसेच इतर सुविधांचा समावेश आहे. यापैकी रुग्णालय आणि रस्ता विकसित करण्यासाठी पालिकेने भुसंपादनासाठी प्रयत्न सुरू केले असून त्यासाठी जिल्हा प्रशासनासोबत पालिका पत्रव्यवहार करीत आहे. दरम्यान, पालिकेने डिसेंबर २०२४ मध्ये ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र पाठविले आहे. त्यात दिव्यातील रुग्णालयाची गरज लक्षात घेऊन येथील भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करावी, तसा अभिप्राय न्यायालयात सादर करुन पुढील प्रक्रिया करावी असे सांगितले असल्याची माहिती पालिकेतील एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

# धुळवडीनंतर अंघोळीसाठी उतरले होते पाण्यात बुडाले
# उल्हास नदीत मृत्यू



**■बदलापूर :** धुळवडीचा आनंद घेतल्यानंतर उल्हास नदीत अंघोळीसाठी गेलेल्या चौघांचा मृत्यू झाला आहे. बदलापूरच्या वेशीवर असलेल्या चामटोली येथील नदीपात्रात ही घटना घडली चारही तरुण दहावीचे विद्यार्थी होते. शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास बदलापूरच्या वेशीवर असलेल्या पोद्दार गृह संकुलातील सात ते आठ मुले धुळवड खेळल्यानंतर उल्हास नदीत अंघोळीसाठी गेले होते. या भागात नदीपात्राला खोली असून पाण्याचा अंदाज न आल्याने आर्यन मेदर (१६) हा तरुण बुडू लागला. त्यावेळी इतर तरुण त्याला वाचवण्यासाठी गेले. या प्रयत्नात आर्यन सिंग (१५) सिद्धार्थ सिंग (१६) आणि ओमसिंग तोमर (१५) हे सुद्धा बुडाले, अशी माहिती कुळगाव पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांनी दिली आहे. तरुण ज्या ठिकाणी गेले त्या भागात सहसा कुणी जात नाही अशीही माहिती पाटील यांनी दिली. तर हा प्रकार पाहून ग्रामस्थांनी मदतीसाठी धाव घेतली. यावेळी इतर चार मुलांना ग्रामस्थांनी सुखरूप पाण्याबाहेर काढले. या घटनेची माहिती मिळतच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थ, अग्निशमन दल आणि पोलिसांच्या मदतीने चौघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. चौघांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी बदलापूरच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले होते.

# ठाणे जिल्ह्याला मेट्रोची आणखी काही वर्षे प्रतीक्षा
# कल्याण-तळोजा मेट्रोचे काम ३ टक्केच

**■ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील शहरे एकमेकांना जोडण्यासाठी गेल्या सहा ते सात वर्षांपासून उभारण्यात येत असलेल्या मेट्रो प्रकल्पाची कामे संथगतीने सुरू असल्याची बाब राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून समोर आली आहे. कल्याण-तळोजा मेट्रो प्रकल्पाची स्थापत्य कामे जेमतेम ३ टक्के इतकीच झाले असून वडाळा ते कासारवडवली मेट्रोसाठी दोन वर्ष तर, ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रोसाठी चार वर्षे नागरिकांना वाट पाहावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

ठाणे जिल्ह्यातील रस्ते तसेच रेल्वे वाहतूकीवरील प्रवाशांचा भार कमी व्हावा तसेच नागरिकांना सार्वजनिक वाहतूकीसाठी नवा पर्याय उपलब्ध व्हावा या उद्देशातून राज्य सरकारने मुंबईसह ठाणे जिल्ह्यात मेट्रो प्रकल्पाचे जाळे विणण्याचा निर्णय घेतला. या नुसार, ठाणे जिल्ह्यात वेगवेगळ्या मेट्रो मार्गांची घोषणा करण्यात आली असून या सर्व प्रकल्पांची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहेत. मेट्रोच्या माध्यमातून जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, कल्याण, मिरारोड यासह तळोजा परिसर एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. परंतु या सर्व प्रकल्पाची कामे संथगतीने सुरू असल्याची बाब राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून समोर आली असून यामुळे ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना



### ठाणे- भिवंडी मार्गाचे काम

ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो प्रकल्पामुळे तीन शहरे एकमेकांना जोडली जाणार असून हा प्रकल्प महत्वाचा मानला जात आहे. २३.५ किमी लांबीचा हा प्रकल्प असून त्याचे काम २०१९ मध्ये हाती घेण्यात आले होते. या मार्गाची कामे दोन टप्प्यात करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात ठाणे ते भिवंडी पर्यंतच्या मेट्रो सेवा सुरू करण्यात येणार आहे. या मेट्रो मार्गावरील स्थापत्य कामे ९४ टक्के पूर्ण झाली आहे. तर, भिवंडी ते कल्याण परिसराला जोडणारी मार्गिकेच्या कामाबाबत मात्र, अहवालात माहिती देण्यात आलेली नाही. या मार्गिकेचे काम पूर्ण होण्यासाठी २०२९ उजाडेल असा अंदाज अहवालात वर्तविण्यात आला आहे.

आणखी काही वर्षे मेट्रोची प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

वडाळा- घाटकोपर- ठाणे- कासारवडवली या मेट्रो प्रकल्पाचे काम २०१८ मध्ये हाती घेण्यात आले होते. सुमारे ३२ किमीचा हा मार्ग असून नोकरदार वगार्साठी हा मार्ग महत्वाचा ठरणार आहे. या मागार्ची स्थापत्य कामे ७५ टक्के पूर्ण झाली आहेत. उर्वरित २५ टक्के कामे एप्रिल २०२७ मध्ये पूर्ण होण्याचा अंदाज राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी आणखी दोन वर्षे वाट पाहावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे. या मागार्लाच जोडण्यात येत असलेल्या २.७ किमी लांबीच्या कासारवडवली ते गायमुख मेट्रो प्रकल्पाची स्थापत्य कामे ८६ टक्के पूर्ण झाली आहेत तर, १४ टक्के कामे डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण केली जाणार आहेत.

मिरारोड येथील गायमुख ते शिवाजी चौक या मेट्रो प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असल्याचा उल्लेख करत हे काम डिसेंबर २०२७ मध्ये पूर्ण होईल, असा दावा अहवालात करण्यात आला आहे. नवी मुंबई सीबीडी बेलापूर ते पेंधर ही मेट्रो सेवा सुरू झाली असली तरी कल्याण-तळोजा मेट्रो प्रकल्पाची स्थापत्य कामे जेमतेम ३ टक्के इतकीच झाल्याची बाब अहवालातून समोर आली आहे.

# संशयातून तरुणाला बेदम मारहाण

**■पुणे :** प्रेमसंबंधाच्या संशयातून तरुणाला दांडक्याने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना सुखसागरनगर परिसरात घडली. तरुणाचा खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी चौघांना अटक केली.

ऋषीकेश दीपक खोपडे (वय २६, रा. सुखसागरनगर, बिबवेवाडी) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी प्रणव प्रशांत जगताप (वय २५, रा. बिबवेवाडी), सार्थक संतोष भोर (वय २१, रा. धनकवडी), कुमार तुळशीराम भागवत (वय २४), अमर अशोक लोंढे (वय २०, दोघे रा. कात्रज) यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खोपडे याचे एका तरुणीशी प्रेमसंबंध असल्याचा संशय आरोपींना होता. रात्री साडेदहाच्या सुमारास खोपडे सुखसागरनगर परिसरातून निघाला होता. त्या वेळी आरोपी जगताप, भोर, भागवत, लोंढे यांनी खोपडेला अडवले. त्याला लाथाबुक्क्यांनी, तसेच दांडक्याने बेदम मारहाण केली. मारहाणीत खोपडे गंभीर जखमी झाला.



# स्थानकात महिला प्रवाशाला शीतपेयात गुंगीचे द्रव्य देऊन लुटले

**■कल्याण :** कल्याण रेल्वे स्थानकात एका महिला प्रवाशाला शीतपेयातून गुंगीचे द्रव्य देऊन या महिलेची शुध्द हरपताच एका भुरट्या चोराने त्यांच्या अंगावरील दोन लाख ३३ हजाराचा सोन्याचा ऐवज लुटून पळ काढला. या प्रकरणात तीन इसम सहभागी असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांच्या विरुध्द कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरी कांदे यांनी दिली. रविवारी रात्री हा प्रकार कल्याण रेल्वे स्थानकात घडला.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की कर्नाटक राज्यातील विजयनगर जिल्ह्यातील उचंगीदुर्ग येथे राहणाऱ्या सुनिता बेळकरी (५०), त्यांची बहिण लक्ष्मी, नातू या कल्याण परिसरात राहत असलेल्या आपल्या नातेवाईकांकडे काही कामानिमित्त आल्या होत्या. त्या पुन्हा आपल्या गावी परत जाण्यासाठी रविवारी रात्री कल्याण रेल्वे स्थानकात आल्या. त्या पुदुचेरी एक्सप्रेसने प्रवास करणार होत्या. सुनिता यांच्या सोबत त्यांची बहिण लक्ष्मी आणि नातू होता.

रात्री साडे नऊ वाजता पुदुचेरी एक्सप्रेस कल्याण रेल्वे स्थानकात आली. एक्सप्रेसमध्ये चढण्याची लगबग सुरू असताना एका अज्ञात प्रवाशाने घाईघाई करत लक्ष्मी यांना आग्रह करत गुंगीचे द्रव्य असलेले शीतपेय पिण्यास दिले. या अज्ञात प्रवाशाच्या सोबत अन्य दोन ३० ते ३५ वयोगटातील इसम होते. एक्सप्रेसमध्ये त्या सामान्य डब्यात चढल्या. आसनावर बसल्यानंतर लक्ष्मी यांना काही वेळाने गुंगी आली. या संधीचा गैरफायदा घेत तिन्ही भुरट्यांनी लक्ष्मी यांच्या गळ्यात, कानात असलेले दोन लाख ३३ हजार रूपयांचे सोन्याचे दागिने काढून घेतले. पुढील रेल्वे स्थानक येताच भुरटे उतरून पळून गेले.

शुध्दीवर आल्यावर लक्ष्मी यांना आपल्या गळ्यातील सोन्याचे दागिने गायब असल्याचे दिसले. त्यांनी जवळील पिशव्या शोधल्या त्यात दागिने मिळाले नाहीत. अज्ञात चोरट्याने ते लुटून नेले असल्याचा संशय घेत त्यांनी स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. हा गुन्हा कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात वर्ग झाला.

पोलिसांनी तातडीने रेल्वे स्थानकातील कल्याण रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही चित्रण तपासले. त्यात त्यांना तीन जण या महिले भोवती फिरत असल्याचे दिसले. या तिन्ही इसमांची ओळख पटवून त्यांना अटक करण्यासाठी पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. आता सुट्टीचा हंगाम सुरू होणार आहे. कल्याण रेल्वे स्थानक, दिवा रेल्वे स्थानकात लांब पल्ल्यांचे फलाट असलेल्या भागात हे प्रकार वाढण्याची शक्यता विचारात घेऊन लोहमार्ग पोलीस, रेल्वे सुरक्षा जवानांनी फलाटावरील गस्त वाढविण्याची मागणी रेल्वे प्रवासी संघटनांकडून केली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com